# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.१२/ २०१५ — दिनांक २७.०७.२०१५

स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर — वेळ- दुपारी ०४.०० वाजता

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २७.०७.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २३१८/ २०१५, दिनांक २७ जुलै, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दिनांक २७.०७.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

उपस्थितीची नोंद घेण्यात येऊन, विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** — **दिनांक २३.०७.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२१२** — दिनांक २३.०७.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** — **सुरक्षा साहित्य खरेदीकामी नमुन्यांची पहाणी करणे.**

**निर्णय क्र.२१३** — **खरेदी करावयाच्या सुरक्षा साहित्यांच्या नमुन्यांची पहाणी व तपासणी करणेकामी आजचे सभेत मा.डॉ.सौरव त्रिपाठी, अहमदनगर हे त्यांच्या सहका-यांसह उपस्थित होते. समितीने कुंभमेळयानिमित्त लागणारे आवश्यक सुरक्षा साहित्य खरेदीबाबतच्या निविदाप्रक्रियेचा आढावा घेतला. त्यानंतर निविदाधारकांना सभेसमोर बोलविणेत आले असता, मे.युनिक, पुणे हे एकच निविदाधारक उपस्थित होते व त्यांनी फक्त रेनकोट व ताडपत्रीचे कापड असे दोनच नमुने सभेस दाखविणेसाठी सोबत आणलेले होते.**

**वेळोवेळी निविदाधारकांना कळवूनही निविदाधारक नमुने सोबत घेऊन येत नाहीत व सभेचा वेळही वाया जातो, याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व दि.०१ ऑगष्ट २०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे नमुने पाहून त्यांची निवड करणेसाठी, नमुन्यांसह उपस्थित रहाणेबाबत सर्व निविदाधारकांना कळविणेत यावे, अशा सुचना दिल्या.**

**तसेच या सुरक्षा साहित्यांच्या यादीमध्ये असेही काही साहित्य आहे की, जे संस्थानसाठी ब-याचवेळा खरेदी करणेत आलेले आहे (उदा.टेबल, कपाट). असे साहित्य संस्थानला पुरविणा-या पुरवठाधारकांनाही निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** — **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात इ.१२वी कला व वाणिज्य शाखेच्या तुकडयात नैसर्गिक वाढ करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद-** क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा वि तसे करण्यास सहायय करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-** नवीन

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी शैक्षणिक विभागात सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षा इ. ११ वी वर्गाच्या कला व वाणिज्य शाखेच्या प्रत्येकी दोन तुकडया सुरु करणेस मा.व्यवस्थापन समिती दि. ०५/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ४२८ अन्वये सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत आला होता. त्यास शासनाची मान्यता मिळालेली आहे.

**मागणी-** सन २०१५-१६ मध्ये कनिष्ठ महाविदयालयातील १२ वी कला व वाणिज्य शाखेच्या नैसर्गिक वाढीने तिसरी नवीन तुकडया सुरु करण्यात आलेल्या आहे. त्या तुकडयांचा नैसर्गिक वाढीचा प्रस्ताव मान्येतेसाठी शासनाकडे पाठविणे आहे. तसेच श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यातील इंग्रजी विषयाचे श्री अरुण बाबुरा घोडके यांचेकडे पर्यावरण नवीन शिक्षकांची आवश्यकता आहे. तथापी नवीन शिक्षक कंत्राटी पध्दतीने तातडीने तात्पुरते घ्यावे लागतील.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान-** इ.१२ वी कला व वाणिज्य तुकडया नैसर्गिक वाढ करणेचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** सन २०१५-१६ मध्ये कनिष्ठ महाविदयालयातील १२ वी कला व वाणिज्य शाखेच्या नैसर्गिक वाढीने तिसरी नवीन तुकडया सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील १२ वी कला व वाणिज्य शाखेची नैसर्गिक वाढीने तिसरी नवीन तुकडी सुरु करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणेस व प्रस्तावातील मागणीप्रमाणे कंत्राटी पध्दतीने एक शिक्षक घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य कनिष्ठ महाविद्यालय)

---

विषय नं.०४ **मौजे शिर्डी व कनकुरी येथील जमीन खरेदीबाबत.**

प्रस्ताव- खालीलप्रमाणे अर्जदार यांनी त्यांच्या मालकीच्या जमीनी संस्थानला विकत देणेबाबत प्रस्ताव दिलेले आहेत.

| अ.नं. | खातेदाराचे नाव | गाव | सर्व्हे नं. गट नं. | ७/१२ नुसार क्षेत्र हे-आर-चौमी | विक्री करावयाचे क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके | शिर्डी | २१२/२ | ००-९७-००<br>००-४०-००<br>पोख<br>------------<br>०१-०१-०० | ०१-४०-०० |
| | | | २१२/३ | ००-९८-०० | |
| ०२ | श्री.पंडीतराव नानासाहेब शेळके | शिर्डी | २०३/२ | ०२-६२-०० | ००-६०-०० |
| ०३ | श्रीमती नलिनी संपतराव शेळके<br>श्री.मिलींद संपतराव शेळके<br>श्री.राहुल संपतराव शेळके | शिर्डी | २०३/१ | ०२-५३-०० | ००-६०-०० |
| ०४ | श्री.साहेबराव नामदेव शेळके | शिर्डी | २१३/१ | ००-७९-०० | ००-४०-०० |
| ०५ | श्री.बाजीराव नामदेव शेळके | शिर्डी | २१३/१ | ००-६७-०० | ००-४०-०० |
| ०६ | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर | कनकुरी | १४३/५ | ०१-५१-५० | ०१-५१-५० |

वरीलपैकी अ.नं.१ ते ५ श्री.शेळके यांच्या जमीनी शिर्डी वाढीव क्षेत्र विकास आराखडयानुसार संस्थानकरीता आरक्षीत क्षेत्रामध्ये आहेत.

शिर्डी वाढीव क्षेत्र विकास आराखडयानुसार खालीलप्रमाणे क्षेत्र संस्थानकरीता आरक्षीत आहे.

| आरक्षण क्र | आरक्षणाचा हेतु | आरक्षीत क्षेत्र हे.आर. | सर्व्हे नंबर | विकसन यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| ०१ | पार्किंग | २.५९ | २०७पै.,२०८पै.,२१५पैते२१९ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| ०२ | उद्यान | २.९७ | २०५ पै.,२०६ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| ०४ | वृध्दाश्रम | १.०० | २२१ पै. ते २२३ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| ०७ | संस्थान हेतु | २.०० | २०२ पै.,२०३ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| २२ | शैक्षणीक हेतु करीता | ६.५५ | १९५पै.,१९६पै.,२१२ पै.,२१३ पै. | श्री साईबाबा संस्थान |

सदरचे प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे अनुक्रमे दि.३/८/२०१४ व २८/८/२०१४ रोजीचे सभेत सादर करण्यात आले होते. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

*'यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीं च्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमीन संस्थानला घेणेसाठी त्या जमिनीची अंतिम किंमत बाजारभावाप्रमाणे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून निश्चित करावी व मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे अर्ज करावा व त्यातील आदेश /परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी,असे ठरले.'*

दुय्यम निबंधक,राहाता (श्रेणी १) यांचेकडून सन २०१४ मधील प्रस्तुत जमीनीचे शासकीय बाजारमुल्य दर घेण्यात आलेले आहेत.सदर शासकीय दराबाबत वरील सर्व अर्जदार यांनी लेखी कळविले आहे की, दुय्यम निबंधक, राहाता यांनी दिलेले शासकीय बाजारमुल्य दर आम्हाला मान्य आहेत परंतु जर खरेदी व्यवहार सन २०१५ मध्ये झाल्यास त्या वर्षीचे शासकीय बाजारमुल्य दराने जमीन खरेदी करावी.

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सदर जमीनी खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२३१५/२०१४ सादर करण्यात आले होते. त्यावर मा.न्यायालयाने दि.१३/३/२०१५ रोजीचे आदेशान्वये सिव्हील अॅप्लीकेशन मधील परिच्छेद 'ब' मध्ये नमुद केलेल्या शर्तीनुसार या क्षेत्राचे मा.दुय्यम निबंधक यांनी प्रमाणीत केलेल्या प्रचलित बाजारभावाचे दरानुसार खरेदी करणेस अनुमती दिलेली आहे.

संस्थानचे वकील अॅड.जे.के.गोंदकर यांचेकडून प्रस्तुत जमीनीचे सर्च रिपोर्ट घेण्यात आलेले असून सदर जमीनी खरेदीबाबत त्यांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे.

शिर्डी वाढीव क्षेत्र विकास आराखडयानुसार अर्जदार यांचे आरक्षीत क्षेत्राची माहिती शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडून घेण्यात आलेली असून त्यानुसार खालीलप्रमाणे क्षेत्र संस्थानकरीता आरक्षीत आहे.

| अ.नं. | खातेदाराचे नाव | सर्व्हे नं./ गट नं. | आरक्षीत क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके | २१२/२ | ००-५८-११-६० |
| | | २१२/३ | ००-९९-१८-४० |
| | एकूण क्षेत्र | | ०१-५७-३०-०० |
| ०२ | श्री.पंडीतराव नानासाहेब शेळके | २०३/२ | ०१-०५-००-०० |
| ०३ | श्रीमती नलिनी संपतराव शेळके<br>श्री.मिलींद संपतराव शेळके<br>श्री.राहुल संपतराव शेळके | २०३/१ | ००-८९-००-०० |
| ०४ | श्री.साहेबराव नामदेव शेळके | २१३/१ | अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही |
| ०५ | श्री.बाजीराव नामदेव शेळके | २१३/१ | |

श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके यांचे संस्थानकरीता आरक्षीत असलेले क्षेत्र दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडील सन २०१४ किंवा सन २०१५ चे शासकीय दराप्रमाणे खरेदी करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता.त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७ अन्वये-

'यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके,शिर्डी यांचे प्रस्तावित क्षेत्र सुधारित विकास आराखडयानुसार संस्थानकरीता शैक्षणिक कामासाठी आरक्षीत असल्याचे दिसून येते. सबब सदरहु क्षेत्र भू-संपादनामार्फत संस्थानला घेणेसाठी त्वरीत भू-संपादनाची कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.'

तथापि श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके यांनी दि.१५/६/२०१५ रोजीचे अर्जान्वये, सदर जमीन भूसंपादनाची प्रकीया राबवुन संस्थानने घेतली तर नवीन शासनाच्या निर्णयाप्रमाणे संस्थानला प्रचलित रेडीरेकनर दराच्या अडीचपट रक्कम मोबदला म्हणून द्यावी लागेल. त्यामध्ये संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल व त्याचप्रमाणे भूसंपादन कार्यवाहीस वेळ लागेल त्यामुळे माझेही नुकसान होईल.

सदरची जमीन नवीन विकास आराखडयामध्ये शैक्षणिक कारणासाठी आरक्षित असून त्याची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान आहे. सदरची जमीन श्री साईबाबांचे कामासाठी उपयोगात येणार असल्यामुळे मी ती प्रचलित दरानुसार संस्थानला खरेदी खताने देण्यास तयार आहे.

तरी माझ्या अर्जाचा फेरविचार करुन सदर जमीनीचे संस्थानने भूसंपादन करण्याऐवजी खरेदी खताने लवकरात लवकर विकत घ्यावी,अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जास अनुसरुन इकडील दि.१८/६/२०१५ रोजीची कार्यालयीन टिपणी सादर केली असता त्यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी 'याबाबत अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयात नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. चर्चेमध्ये सदरच्या जागांच्या खरेदीपुर्वी वृत्तपत्रात जाहिर नोटीस देऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. वृत्तपत्रात नोटीस देण्याची कार्यवाही त्वरीत करावी.' असे निर्देश दिलेले आहेत.

तरी श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके यांचे जमीन खरेदीबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.३/८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.६२८ संमत झालेला आहे. त्यानंतर त्याच जमीनीबाबत भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेत यावी असा ठराव मा.त्रिसदस्य समितीचे दि.१६/४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७ अन्वये पारीत झालेला आहे. त्यानंतर याबाबत मा.जिल्हाधिकारी साहेब यांचे कार्यालयात अहमदनगर येथे दि.२२/६/२०१५ रोजी मा.त्रिसदस्य समितीचे सभेत चर्चा होऊन श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके यांची जमीन भूसंपादनाऐवजी खरेदी पध्दतीने घेण्यात यावी व सर्व अर्जदार यांच्या जमीनी खरेदीकामी वृत्तपत्रात जाहीर नोटीस देण्यात यावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले आहे.

त्यानुसार पुढील प्रमाणे श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे क्षेत्र खरेदीसाठी वृत्तपत्रात देणेकामी एकत्रित जाहीर नोटीस संस्थानचे वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेकडून तयार करुन घेता येईल. तसेच श्री.बाजीराव नामदेव शेळके व श्री.साहेबराव नामदेव शेळके यांचे आरक्षीत क्षेत्राची माहिती उपलब्ध झालेली नसल्याने सदरची माहिती उपलब्ध झाल्यानंतर त्यांचे क्षेत्र खरेदीबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

| अ.नं. | खातेदाराचे नाव | गाव | सर्व्हे नं./ गट नं. | आरक्षीत क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके | शिर्डी | २१२/२ | ००-५८-११-६० |
| | | | २१२/३ | ००-९९-१८-४० |
| | | | एकूण क्षेत्र | ०१-५७-३०-०० |
| ०२ | श्री.पंडीतराव नानासाहेब शेळके | शिर्डी | २०३/२ | ०१-०५-००-०० |
| ०३ | श्रीमती नलिनी संपतराव शेळके<br>श्री. मिलींद संपतराव शेळके<br>श्री.राहुल संपतराव शेळके | शिर्डी | २०३/१ | ००-८९-००-०० |
| ०४ | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर | कनकुरी | १४३/५ | ०१-५१-५० |

तरी वरील प्रमाणे क्षेत्र खरेदीकामी दैनिक वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.२१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जमीन खरेदीबाबत महाराष्ट्र शासनाचा नवीन निर्णय (G.R.) झालेला असून, त्या निर्णयाचा तसेच मा.उच्च न्यायालयाचे कागदपत्रांचा अभ्यास करुन सदरहू प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. तोपर्यंत मौजे शिर्डी व कनकुरी येथील जमीन खरेदी करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

विषय नं.०५ **स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- स्टेट बॅंक आफ इंडिया,शाखा शिर्डी यांना सिटी सर्व्हे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ स्के.मीटर जागा वापरास दि.११/११/२०१४ ते दि.१०/११/२०१५ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये शाखाधिकारी,स्टेट बॅंक आफ इंडिया शाखा शिर्डी यांनी सिटी सर्व्हे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ स्के.मीटर जागेस दि.११/११/२०१५ ते दि.१०/११/२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

स्टेट बॅंक आफ इंडिया शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीच्या साईनाथ छाया या इमारतीतील जागा भाडे तत्वावर देणेबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.०४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८८८ या निर्णयास अनुसरुन मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं.३३८६/२०१४ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१४ रोजीचे खालील प्रमाणे आदेशान्वये जागा वापरास देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.

उपरोक्त आदेशास अनुसरुन तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१ अन्वये स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना इकडील कार्यादेश जा.क्र.एसएसएस/वशी-मालमत्ता/ ८६४ / २०१५ दि.१५/०५/२०१५ अन्वये मासिक भाडे रु.७१,३३५/- व मिटर प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन दि.११/११/२०१४ ते दि.१०/११/२०१५ या कालावधीकरीता करारानुसार मासिक भाडे तत्वावर जागा वापरास देण्यात आलेली असुन त्याची मुदत दि.१०/११/२०१५ अखेर संपुष्टात येत आहे. आता स्टेट बॅंक आफ इंडिया यांनी दि.११/११/२०१५ ते दि.१०/११/२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४–** कलम १७/(३) नुसार विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशा आशयाचा आहे.

**मा. उच्च न्यायालयाचे दि.१६/१०/२०१२ रोजीचे निर्देश – ६ (अ)** मध्ये shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2 trust; असा असून त्यात संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीच्या हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये व **(ब)** मध्ये shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust; असा असून त्यात संस्थान मार्फत कोणत्याही प्रकारचे अचल मालमत्तेच्या खरेदीचे कॉन्ट्रक्ट किंवा करारनामे करु नये, असा आदेश झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त संस्थान अधिनियम व मा.उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशाचा विचार करता, स्टेट बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना संस्थानचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ स्के.मी. जागा बॅंकेसाठी दि.११/११/२०१५ ते दि.१०/११/२०१६ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन म्हणजेच रु.७१,३३५/- +रु.७१३४/- (१०%)= रु.७८,४६९/- (अक्षरी रुपये अठ्याहत्तर हजार चारशे एकोणसत्तर मात्र) भाडे आकारण्यात येऊन व मिटररिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेतील मान्यतेने मुदतवाढ देता येईल.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिनियम व मा.उच्च न्यायालयाच्या दि.०२.०५.२०१४ रोजीचे आदेशाचा विचार करता स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना साईनाथ छाया इमारतीतील पाहिल्या मजल्यावरील जागेस मागील मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा याप्रमाणे मासिक भाडे आकारणेत येऊन दि.११.११.२०१५ ते दि.१०.११.२०१६ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०६** **स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम.चे जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.साठी सिटी सर्व्हे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्के.मीटर जागा वापरास देण्यात आलेली असून सदरची मुदत दि.२७/७/२०१५ अखेर संपुष्टात येत आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शाखाधिकारी,स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांनी सिटी सर्व्हे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम.केन्द्रासाठी देण्यात आलेल्या जागेस दि.२८/७/२०१५ ते दि.२७/७/२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीच्या साईनाथ छाया या इमारतीतील जागा भाडेतत्वावर देणेबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८८४ या निर्णयास अनुसरुन मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं.३३८६/२०१४ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२/५/२०१४ रोजीचे आदेशान्वये जागा वापरास देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.

उपरोक्त आदेशास अनुसरुन तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५९ नुसार तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना इकडील कार्यादेश जा.क्र.एसएसएस/वशी-मालमत्ता/१५५९/२०१५ दि.१८/६/२०१५ अन्वये मासिक भाडे तत्वावर ए.टी.एम.साठी जागा वापरास देण्यात आलेली असुन त्याची मुदत दिनांक २७/०७/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४**– कलम १७(३) नुसार विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकता येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही. अशा आशयाचा आहे.

**मा. उच्च न्यायालयाचे दि.१६/१०/२०१२ रोजीचे निर्देश – ६ (अ)** मध्ये shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2 trust; असा असून त्यात संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीच्या हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये व (ब) मध्ये shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust; असा असून त्यात संस्थान मार्फत कोणत्याही प्रकारचे अचल मालमत्तेच्या खरेदीचे कॉन्ट्रक्ट किंवा करारनामे करु नये, असा आदेश झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय** – उपरोक्त संस्थान अधिनियम व मा. उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशाचा विचार करता, स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना संस्थानचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी. जागा ए.टी.एम. साठी दि.२८/०७/२०१५ ते दि.२७/०७/२०१६ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन म्हणेजच रु.४३५६/- + रु.४३६/- (१०%) = रु.४७९२/- (अक्षरी रु.चार हजार सातशे ब्यान्नव मात्र) भाडे आकारण्यात येऊन व मीटर रिडींगप्रमाणे विदयुत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देता येईल.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिनियम व मा.उच्च न्यायालयाच्या दि.०२.०५.२०१४ रोजीचे आदेशाचा विचार करता स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांना साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावर ए.टी.एम. साठी दिलेल्या जागेस मागील मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ व मीटर रिडींगप्रमाणे विदयुत आकार वेगळा याप्रमाणे मासिक भाडे आकारणेत येऊन दि.२८.०७.२०१५ ते दि.२७.०७.२०१६ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मालमत्ता विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना सबस्टेशनसाठी दिलेल्या जागा वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१२/८/२००१ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे टेक्नीकल डायरेक्टर श्री.शामसुंदर देव व श्री साईबाबा संस्थानचे तत्कालीन मा.विश्वस्त यांचेमध्ये शिर्डी साठी स्वतंत्र ५ एम.व्ही.ए./३३ के.व्ही.ए. क्षमतेचे सबस्टेशन मिळणेबाबत चर्चा

झाली असता, या सबस्टेशन उभारणीसाठी येणारा अंदाजे खर्च १.५ कोटी विद्युत मंडळ करील व याकामी आवश्यक असणारी जागा संस्थानने उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी त्यांनी केली. त्यानुसार नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री.अग्रवाल यांना त्वरीत शिर्डी येथील सबस्टेशनचा प्रस्ताव सादर करणेस तसेच हा प्रस्ताव विद्युत मंडळ तातडीने मंजूर करणार असल्याचे सांगण्यात आले.

दि.१६/१०/२००२ रोजीचे पत्रान्वये कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,संगमनेर यांनी, आगामी सिंहस्थ पर्वणीच्या संदर्भात अपेक्षित मागणी पुरविण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने शिर्डी येथे ३३/११ केव्ही चे एक उपकेन्द्र तातडीने मंजूर केले असून त्यासाठी १०० मीटरx १५० मीटर जमीन लवकरात लवकर मिळावी अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे सादर करणेत आला होता.

"सध्या संस्थानला व शिर्डी गावाला निमगाव येथील ३३/११ हजार व्होल्ट, ५ एमव्हीए क्षमतेच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. निमगाव येथून शिर्डीसाठी जो ११ के.व्ही.ए. चा विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे त्याचे कंडक्टर्स बरेच जुने झाले असून कमी क्षमतेचे आहेत. शिर्डी गावातील तसेच संस्थानचा वीजभार दिवसेंदिवस वाढत आहे. या जादा भारामुळे वारंवार कंडक्टर तुटणे, इन्सुलेटर खराब होणे इ.मुळे ब-याच वेळा विद्युत पुरवठा खंडीत होतो. त्यामुळे संस्थानला विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जनरेटरचा वापर करावा लागतो."
सदर प्रस्तावीत विद्युत उपकेंद्र कार्यान्वीत झाल्यास विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण नाहीसे वा अत्यंत कमी होऊन, शिर्डी शहर व संस्थानला महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा वीज पुरवठा अखंडित वा जास्त वेळ मिळून संस्थानचा जनरेटरसाठी डिझेल खरेदीकामी होणारा खर्च कमी होईल. सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.९-१०/८/२००३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७१ पुढील प्रमाणे झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने नव्याने खरेदी केलेल्या शेती महामंडळाचे जमीनीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे उपकेंद्रासाठी आवश्यक असणारी ६५ मीटर x ८० मीटर जागा रु.१०१/- वार्षिक या नाममात्र भाडे दराने ११ वर्षाचे कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यात यावी आणि सदर ११ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यापुढील कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांचे परस्पर संमतीने व सहमतीने झालेल्या अटी-शर्तीनुसार त्या कराराचे नुतनीकरण करण्यात यावे, असे ठरले. याकामी मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची परवानगी सत्वर घेण्यात येऊन आवश्यक तो करारनामा करुन घेण्यात यावा.

सदर प्रकरणी मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.२३/३/२००४ रोजीचे आदेशान्वये मान्यता दिलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.९-१०/८/२००३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७१ अन्वये तसेच मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडील मान्यतेने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गट नं.८७ पै.क्षेत्र २४.५० आर व गट नं.८८ पै.क्षेत्र २७.५० आर असे एकूण ५२ आर क्षेत्र रु.१०१/- (अक्षरी रुपये एकशे एक मात्र) वार्षिक भाडे आकारणीवर ११ वर्षे मुदतीच्या करारावर दि.२५/६/२००४ रोजी पासून भाडेपट्टयाने देण्यात आलेले आहे. सदर भाडेपट्टयाची मुदत दि.२४/६/२०१५ रोजी संपुष्टात आलेली आहे.

आता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.संगमनेर यांनी सदर जागा वापराचा पुढील करारनामा करणेबाबत विनंती केलेली आहे.

संस्थानला सन २००४ मध्ये नविन अधिनियम लागू झालेला आहे. त्यामध्ये कलम २४ (१) ची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

२४(१) जेथे शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथील "श्री साईबाबा शिर्डी संस्थान" या नावाची पुर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही, किंवा तिचा कोणताही विश्वस्त हा,नियत दिवसाच्या लगतपुर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या नावाने कलम (३) अन्वये पुर्नगठीत करण्यात आलेल्या विश्वस्तव्यवस्थेमध्ये विहीत कोणत्याही मालमत्तेच्या, हक्काच्या, दायित्वाच्या किंवा बंधनाच्या संबधातील कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत एक पक्षकार असेल त्याबाबतीत उक्त पुनर्गठीत विश्वस्तव्यवस्थेला किंवा तिच्या समितीचा त्या कार्यवाहीतील एक पक्षकार म्हणून पुर्वीची सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा तिचे विश्वस्त या ऐवजी दाखल करण्यात आले असल्याचे किंवा यथास्थिती किंवा त्यातील एक पक्षकार म्हणून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि कार्यवाही तदनुसार चालु ठेवण्यात येईल.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कार्यातील किंवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही नियमातील, विनियमातील,अधिसुचनेतील किंवा आदेशातील किंवा कोणत्याही विलेखातील किंवा इतर दस्तऐवजातील,पुर्वीची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा तिचे विश्वस्त याबाबतच्या

कोणत्याही निर्देशाचा अर्थ नियत दिवशी किंवा त्यानंतर, संदर्भानुसार दुसरा अन्वयार्थ लावणे आवश्यक नसेल तर, यथास्थिती कलम ३ अन्वये पुनर्गठीत विश्वस्तव्यवस्था किंवा तिची समिती याबद्दलचा निर्देश असा लावण्यात येईल.

तसेच अधिनियमामध्ये संस्थान मिळकतीबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

17(3) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही.

माउच्च न्यायालय., मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं २०१२/१२०५६. .पीआय१६मध्ये दिनांक २०११/१८.नं.एल. ऑक्टोबर, २०१२ रोजी समितीला खालील प्रमाणे आदेश दिलेले आहे.

(6) We direct that, without prior permission of this court, the committee-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2-trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2-trust:

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

मा.व्यवस्थापन समितीचे दि.९-१०/८/२००३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना प्रस्तुत मिळकत ११ वर्ष मुदतीच्या करारावर दि.२५/६/२००४ रोजी पासून भाडेपट्टयाने देण्यात आलेली आहे. मात्र संस्थान अधिनियम सन २००४ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. तथापि कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.संगमनेर यांनी सदर जागा वापराचा पुढील करारनामा करणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गट नं.८७ पै.क्षेत्र २४.५० आर व गट नं.८८ पै.क्षेत्र २७.५० आर असे एकूण ५२ आर क्षेत्र रु.१०१/- (अक्षरी रुपये एकशे एक मात्र) वार्षिक भाडे आकारणीवर १ वर्ष मुदतीच्या करारावर दि.२५/६/२०१५ ते दि.२४/६/२०१६ अखेर लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीने देता येईल.

निर्णय क्र.२१८ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांना ३३/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी दिलेल्या जागेस लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच विद्युत वितरण कंपनीस उपकेंद्रासाठी कायमस्वरुपी जागेची आवश्यकता असते, याकरीता त्यांचेबरोबरचा करारनामा तपासणेत येऊन, सध्या वापरत असलेली जागा उपकेंद्रासाठी कायमस्वरुपी देणेबाबत शासन व मा.उच्च न्यायालय यांची मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.०८ **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्याने देणेत आलेल्या जागेस मुदतवाढ मिळणेबाबत.**

प्रस्ताव- प्रसार भारती (भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी दि.२१/०४/२००३ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर ४००० चौ.फुट मोकळी जागा व ९०० चौ.फुट बांधीव जागा अशी एकुण ४९०० स्क्वे.फुट जागा मिळणेस विनंती केलेली होती. सदर प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ रोजीचे सभेत ठराव क्र.२०७ अन्वये मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून जागा भाडे तत्वावर देण्यात यावी ठरले आहे. सदर ठरावास अनुसरुन दि.०९/०६/२००३ रोजीचे पत्रान्वये मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया यांना संस्थानची जागा भाडे तत्वावर देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.१०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना Low Power T.V. Center शिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केलेप्रमाणे जागा भाडयाने देणेस परवानगी दिलेली आहे.

प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, यांनी दि.०६/०८/२००३ रोजीचे पत्राने (१) पी.डब्ल्यु.डी. यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल, (२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा दयावी लागेल, (३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावे असा राहील, असे इकडील कार्यालयास कळविलेले आहे. प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, यांचे उपरोक्त पत्राबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.४७३ अन्वये प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. त्यानुसार प्रसार भारती यांना दि.२२/०८/२००६ पासून स.नं.१४८ धर्मशाळा सध्या साईनाथ रुग्णालय येथील ४००० चौ.फुट मोकळी जागा व ९०० चौ.फुट बांधीव जागा अशी एकुण ४९०० स्क्वे.फुट संस्थानची जागा व रुम वापरास देण्यात आलेली आहे.

संस्थानला सन २००४ मध्ये नविन अधिनियम लागू झालेला आहे. त्यामध्ये कलम २४(१) ची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

Where the erstwhile public trust by the name of "Shirdi Sansthan of Shree Sai Baba" at Shirdi, District Ahmednagar or any trustee thereof was, immediately before the appointed day, party to any legal proceedings with respect to any property, rights, liabilities or obligations since vested in the reconstituted Trust under section 3 by the name of "the Shree Saibaba

Sansthan Trust, (Shirdi)", the said reconstituted Trust or its Committee, shall be deemed to have been substituted for the erstwhile public trust or its trustees, as a party to those proceedings, or added to as a party thereto, as the case may be, and the proceedings shall continue accordingly,

तसेच या अधिनियमामध्ये संस्थान मिळकतीबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

17(3) No immovable property vested in the Trust shall be leased for more than a year, or mortgaged, slod or otherwise alienated by the committee, expect with the previous sanction in writing of the State Government.

यापुर्वी ठरावाप्रमाणे १५ वर्षासाठी (३-३ वर्षाचे टप्प्याने) लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७(३) च्या तरतुदीप्रमाणे फक्त १ वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते. मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील विषय नं.६२ निर्णय क्र.७६२ व पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अॅप्लीकेशन नं.३६८६/२०१४ अन्वये मा. उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१४ रोजीचे खालील प्रमाणे आदेशान्वये जागा वापरास देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त परवानगीने तसेच दि. ०९/१२/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. १०२९ अन्वये प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना दि.२१/०८/२०१४ ते दि.२०/०८/२०१५ अखेर १२ महिने कालावधीसाठी इकडील जा.क्र.एसएसएस/मालमत्ता/ १२६६/२०१५ दि.०२/०६/२०१५ अन्वये मुदतवाढीचा आदेश देण्यात आलेला असून त्याची मुदत दि.२०/०८/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी दि.०६/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये लिजडीड पुढील दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१६ अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ व दि. ०५/१०/२००३ चे सभेतील निर्णयानुसार व मा.उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशान्वये प्रस्तुत मिळकत प्रसार भारती यांना वापरास दिलेली आहे. जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे व प्रत्येक ३ वर्षाने मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन खालीलप्रमाणे आकारणी केलेली आहे.

१) पहिल्या टप्प्यातील ३ वर्षाचे दि.२१/०८/२००३ ते दि.२०/०८/२००६ अखेर रुपये ३३२५/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

२) दुस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००६ ते दि.२०/०८/२००९ अखेर रु.३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.३६५७-५० मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

३) तिस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००९ ते दि.२०/०८/२०१२ अखेर रु.३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४०२४/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

४) चौथ्या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१५ अखेर रु.४०२४/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४४२७/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले असून त्याची चौथ्या टप्प्यातील तीन वर्षाची मुदत दि.२०/०८/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

५) पाचव्या टप्प्यातील तीन वर्षाचे कालावधीसाठी दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१८ अखेर रु.४४२७/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४८७०/- मासिक भाडे आकारुन प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना पुढील दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१६ या एक वर्षाचे कालावधीकरीता मुदतवाढ देता येईल.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना प्रस्तुत मिळकत १५ वर्षासाठी लिज डिडवर देणेस मान्यता आहे. मात्र संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमाचे तरतुदीनुसार प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना १ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना दि.२१/०८/२०१५ ते २०/०८/२०१६ या एक वर्ष कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.४८७०/-

(अक्षरी रु.चार हजार आठशे सत्तर मात्र) व मिटर रिंडीगप्रमाणे विदयुत आकार वेगळा आकारुन तसेच मा. उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन (Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decision.) लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देता येईल.

निर्णय क्र.२१९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिनियम व मायालया न्याउच्च.च्या दि रोजीचे २०१४/०५/०२. आदेशाचा विचार करता, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्याने देणेत आलेल्या जागेस रु.४८७०/- मात्र मासिक परवाना फी व मीटर रीडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा याप्रमाणे मासिक भाडे आकारणेत येऊन, दि.२१.०८.२०१५ ते दि.२०.०८.२०१६ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी.**

**तसेच सदरहू जागा प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना कायमस्वरुपी देणेबाबत त्यांचेबरोबर केलेल्या कराराचा अभ्यास करुन, शासन व मा.उच्च न्यायालय यांची मान्यता घेणेसाठी सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक मालमत्ता विभाग)

---

विषय नं.०९ **नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ मधील गर्दीचे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांसाठी करण्यात येत असलेल्या अतिरिक्त सुविधांकरीता शासन मान्यतेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

| अ.नं. | कलम / तरतुद क्रमांक | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम / उपकलम क्रमांक | तरतुद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४ | समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये | २ (घ) | **भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.** |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (ट) | विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच **विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमिनी व इमारती संपादित करील** किंवा खरेदी करील. |
| ०४ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहुन, **समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतील.** |
| ०५ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग)<br><br>(घ)<br>(ज)<br><br>(त्र) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.**<br>**भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालवणे.**<br>**त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान.**<br>**भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.** |

**मा. त्रिसदस्य समिती निर्णय :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*“.. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले.”*

**मा. उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश :- Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011** वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:-** उपरोक्त संदर्भ क्र. ०१ चे पत्रान्वये महराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी कुंभमेळयाच्या आयोजनासाठी श्री साईबाबा संस्थानकडून खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत उपरोक्त सिव्हील ॲप्लीकेशन अन्वये मा. उच्च न्यायालयाकडे परवानगी देण्याची विनंती केली आहे. त्यानुषंगाने पुढील मुद्याबाबत माहिती शासनास सादर करावी, असे कळविले होते.

१) सदरचा निधी कोणकोणत्या कामासाठी तसेच कशाप्रकारे खर्च करण्यात येणार आहे. याबाबतचा तपशील सादर करावा.

२) सदरचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे काय

३) सदरच्या प्रस्तावास शासन मान्यतेची आवश्यकता आहे किंवा कसे

४) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ च्या कोणत्या तरतुदीनुसार सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्यात श्री साईबाबा संस्थान सक्षम आहे, याबाबतचा तपशील सादर करावा असे कळविलेले होते.

यास अनुसरुन उपरोकत संदर्भ क्र. ०२ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम - २००४ मधील कलम १४ (२) (घ) कलम १७ (१) व (२) कलम १७(६) व कलम २१(१) मधील सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत शिर्डीत होणा-या भक्तांच्या गर्दीस अनुसरुन, त्यांना उपलब्ध करुन द्यावयाचे मुलभूत सोयी-सुविधांसाठी संस्थान व्यवस्थापन व प्रशासन हे याकामी करावयाचे नियोजन व त्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी निर्णय घेणे तसेच याकामी येणा-या अपेक्षित खर्चासाठी आर्थिक नियोजन करणे या बाबींकरीता संस्थान व्यवस्थापन सक्षम आहे, असे शासनास कळविण्यात आलेले आहे.

त्यानंतर आता उपरोक्त संदर्भ क्र. ०३ चे पत्रान्वये महराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी *"प्रस्तुत प्रकरणी सन २०१५ च्या कुंभमेळा कालावधीत शिर्डीत होणा-या संभाव्य गर्दीच्या अनुषंगाने करावयाच्या कामासाठी रु. ५७.५४ कोटी खर्चाच्या मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालयाच्या ओरंगाबाद खंडपिठात संस्थानतर्फे दिवाणी अर्ज क्र. ३५००/२०१५ सादर करण्यात आला होता. यासंदर्भात संस्थानने शासनास कोणताही प्रस्ताव सादर केला नाही. वा शासनाची पूर्वपरवानगी घेतलेली नाही. याबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार संस्थान व्यवस्थापन सक्षम असल्याचे आपण संदर्भाधिन पत्रान्वये नमूद केले आहे. तथापि, सदर खर्चाचे अवलोकन करता काही पदे भरावयाची असल्याचे दिसते. संस्थानच्या आकृतीबंधास शासनाने मान्यता दिलेली असून त्यापेक्षा आधिक पदे तात्पुरत्या स्वरुपात जरी भरावयाची असली तरी त्यास शासनाची मान्यता आवश्यक आहे. तसेच संस्थानच्या मालकीच्या नसलेल्या जमिनीवर खर्च करण्यासाठी देखील शासनाची मान्यता आवश्यक आहे. सबब, यासंदर्भात शासनाची मान्यता घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही विनाविलंब करावी."* असे कळविलेले आहे.

**प्रस्ताव:-** वर नमूद केलेप्रमाणे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी विषयांकित सुविधांचे अपेक्षित खर्चास मान्यता दिलेली आहे. याबाबतचे सिव्हील अर्जावरील सुनावणी दरम्यान सरकारी वकिलामार्फत शासनाने न्यायालयापुढे आपले म्हणणे सादर केलेले आहे. त्यामुळे याकामी शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला नाही.

i. सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत शिर्डीत होणा-या गर्दीचे नियोजनाचा भाग म्हणून साईभक्तांचे वाहनांसाठी शिर्डी व परिसरात ११ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेची कार्यवाही संस्थानकडून सुरु आहे. वाहनतळांचे व्यवस्थेचे ठिकाणी दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालावधीत संस्थानतर्फे तात्पुरती निवारा शेड, क्लोक रुम, स्वच्छतागृहे, अल्पोपहार स्टॉल, सुरक्षा चौक्या इत्यादी या सुविधा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

आता सदर कामांपैकी बहुतांश कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून आवश्यक तेथे खरेदी आदेश व कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार पुरवठादारांकडून आवश्यक साहित्य प्राप्त करणेत येत आहे. तात्पुरत्या स्वरुपाची वाहनतळे विकसीत करणेसाठी मुरुम व खडीकरणाचे काम सुरु करणेत आलेले आहे. याशिवाय वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरीनल्स भाडेतत्वावर घेणेकामी तसेच पत्रा शेड मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली असून कार्यादेश देणेत येत आहेत.

ब) याशिवाय कामगार विभाग यांचे अहवालानुसार होणा-या गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांना दर्शन, निवासस्थान, पार्किंग, भोजन, प्रसाद व इतर सोयी –सुविधा तसेच गर्दीचे नियोजन करावे लागणार असल्याने त्यासाठी प्रासंगिक मनुष्यबळाची आवश्यकता लागणार आहे. सदरचे प्रासंगिक मनुष्यबळ हे ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने प्रतिदिनी १०७५ अकुशल कंत्राटी कर्मचारी खाली नमूद केलेप्रमाणे संबंधीत विभागांना ठेकेदारामार्फत पुरवावे लागणार आहेत.

**१) मे. जय भवानी एंटरप्रायजेस, (लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर) कॅम्प शिर्डी**

| अ.न. | कंत्राटी कर्मचारी पुरविणे कालावधी | विभागाचे नाव | कंत्राटी कर्मचारी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | दि. २७/०८/२०१५ ते दि. ३१/०८/२०१५ | साईधर्मशाळा विभाग | १८ | -- | १८ |
| ०२ | दि. ११/०९/२०१५ ते दि.१५/०९/२०१५ | व्दारावती भक्तनिवासथान | ११ | -- | ११ |
| ०३ | | साईबाबा भक्तनिवासस्थान | १५ | -- | १५ |
| ०४ | दि. १६/०९/२०१५ ते दि.२०/०९/२०१५ | साईप्रसाद निवासस्थान | ३४ | -- | ३४ |
| ०५ | | साईआश्रम भक्तनिवासस्थान | १२ | -- | १२ |
| ०६ | दि. २३/०९/२०१५ ते दि.२७/०९/२०१५ | आरोग्य विभाग | १९० | -- | १९० |
| ०७ | | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४० | ५५ | ९५ |
| ०८ | | संरक्षण विभाग | १५० | -- | १५० |

२) मे. मॉडर्न व्ही. आर. सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे

| अ.न. | कंत्राटी कर्मचारी पुरविणे कालावधी | विभागाचे नाव | कंत्राटी कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | दि. २७/०८/२०१५ ते दि. ३१/०८/२०१५ | श्री साईप्रसादालय विभाग | १७५ |
| ०२ | | कॅन्टीन विभाग | २६ |
| ०३ | दि. ११/०९/२०१५ ते दि.१५/०९/२०१५ | लाडू प्रसाद निर्मिती विभाग | १२ |
| ०४ | | विद्युत विभाग | १४ |
| ०५ | दि. १६/०९/२०१५ ते दि.२०/०९/२०१५ | फायर अॅण्ड सेफ्टी विभाग | ३३ |
| ०६ | | वाहन विभाग | ३५ |
| ०७ | दि. २३/०९/२०१५ ते दि.२७/०९/२०१५ | लेखाशाखा विभाग | १८ |
| ०८ | | प्रकाशने विभाग | १२ |
| ०९ | | मेकॅनिकल विभाग | १० |
| १० | | ध्वनिक्षेपण विभाग | ३५ |
| ११ | | सी.सी.टि.व्ही. कंट्रोल सेल | १२ |
| १२ | | माहिती व तंत्रज्ञान विभाग | ०५ |
| १३ | | मंदिर विभाग | ०९ |
| १४ | | संरक्षण विभाग | १५० |

तसेच दि. २७/०८/२०१५ ते दि. २६/०९/२०१५ अखेर शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील आरोग्य विभागासाठी १०० अकुशल कंत्राटी कर्मचारी व साईमंदिराजवळील रस्त्यावरील फेरीवाले अतिक्रमणे हटविणेसाठी ०४ कंत्राटी कर्मचारी प्रतिदिनी आऊटसोर्सिंग पध्दतीने ठेकेदामार्फत पुरविणेत येणार आहेत. सदरच्या कर्मचा-यांना किमान वेतनदरानुसार वेतन देणेत येईल, व उपरोक्त कालावधीत काम व मुदत संपताच कंत्राटी कर्मचारी बंद करणेत येणार आहेत.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागाने मंजूर केलेल्या आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही. तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतूद कलम १७(१) व २१(१) पर्तता करणेकामी उपरोक्त प्रमाणे प्रासंगिक मनुष्यबळ हे ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने कंत्राटी कर्मचारी पदे तात्पुरत्या स्वरुपात भरणेस मान्यता घेणेकरीता प्रस्ताव शासनास सादर करणे अपेक्षित आहे.

तरी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीसाठी संस्थानतर्फे एकूण रु.५७,५४,८०,०००/- मात्र खर्चाच्या अतिरिक्त सुविधा पुरविणेसाठी व ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने कंत्राटी कर्मचारी पदे तात्पुरत्या स्वरुपात भरणेस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता घेणेसाठी संस्थान अधिनियमातील तरतूदींचा समावेश करणेत येऊन, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कुंभमेळा व शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.१० **सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ मधील गर्दीचे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरीनल्स भाडेतत्वावर घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेविषयी मे.साराप्लास्ट प्रा.लि., पुणे यांचे तक्रारीबाबत**

प्रस्ताव- वरील विषयांकीत निविदा प्रक्रियेबाबत मे. साराप्लास्ट प्रा.लि., पुणे यांनी संदर्भिय पत्राव्दारे मा.अध्यक्ष सो. यांचेकडे हरकत दाखल केली आहे. सदर हरकतीव्दारे मे.साराप्लास्ट यांनी विषयांकित काम चुकीच्या/ अनियमित पध्दतीने YLDA India Pvt. Ltd. यांना बहाल करणेत आल्याचे नमूद केले आहे. मा. अध्यक्ष सो. यांनी संदर्भिय पत्राव्दारे सदर हरकतीविषयी तपासणी करणेबाबत निर्देश दिले आहेत. तरी त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहोत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०६ अन्वये, इकडील विभागामार्फत १६० पोर्टेबल टॉयलेट व १६० युरिनल्स भाडेतत्वावर घेणेकामी दि.१५/०५/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये या कामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई –निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर वेळी तीनच ठेकेदारांनी सदर कामाबाबत ई-निविदा सादर केल्या. प्राप्त ई- निविदांचे तांत्रीक लिफाफ्यातील कागदपत्रांची छाननी केली असता फक्त ०२ ठेकेदार पात्र होत असल्याने दि.१८/०६/२०१५ रोजीचे मंजूर टिपणीन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर याकामी दुस-यांदा निविदा मागविणेसाठी (Second Call) जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदरहू कामाची ई-निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Activity | Date & Time |
|---|---|---|
| 1) | Tender publishing date: | 29/06/2015. |
| 2) | Tender document download start date: | 29/06/2015 from 11:00 Hrs. |
| 3) | Pre-bid meeting date: | 01/07/2015 from 11:00 Hrs. |
| 4) | Tender document download end date: | 06/07/2015 upto 17:00 Hrs. |
| 5) | Bid submission start date: | 29/06/2015 from 12:00 Hrs. |

| | | |
|---|---|---|
| 6) | Bid submission closing date: | 06/07/2015 upto 17:00 Hrs. |
| 7) | Technical bid hard copy submission date: | 07/07/2015 upto 17:00 Hrs. |
| 8) | Bid opening date (Technical): | 08/07/2015 at 11:00 Hrs. (If possible). |
| 9) | Bid opening date (Commercial): | 08/07/2015 at 15:00 Hrs. (If possible). |

उपरोक्तकामी खालील ०४ ठेकेदार यांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| 01) | Saraplast Pvt. Ltd., Pune. | 02) | YLDA India Pvt. Ltd., Pune. |
| 03) | Windoors International Ltd., Mumbai. | 04) | Sahyadri Industries Ltd., Pune. |

वरील प्रमाणे अपलोड झालेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र.०१ (Technical Bid) दि.०८/०७/२०१५ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. प्रशासकिय अधिकारी व लेखाधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन, अपलोड केलेल्या निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी करणेत आली असून त्याचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Contractor | Remark |
|---|---|---|
| 01) | YLDA India Pvt. Ltd., Pune. | Qualify. |
| 02) | Saraplast Pvt. Ltd., Pune. | Qualify. |
| 03) | Windoors International Ltd., Mumbai. | Qualify. |
| 04) | Sahyadri Industries Ltd., Pune. | Does not qualify as certificate for similar type of works not furnished. |

वर नमूद केलेप्रमाणे प्रात्रताधारक ०३ ठेकेदारांच्या वाणिज्यीक निविदा (Commercial Bid) त्याच दिवशी दि.०८/०७/२०१५ रोजी सांय ०४:४३ वाजता मा. प्रशासकिय अधिकारी व उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष उघडणेत आलेले आहेत. ठेकेदार यांनी देऊ केलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**Estimated Value : Rs.66,36,000/-.**

| Sr. No. | Name of Contractor | Quoted Amount (Rs.) | Remarks |
|---|---|---|---|
| **01)** | **YLDA India Pvt. Ltd., Pune.** | **61,44,000/-** | **L1** |
| 02) | Saraplast Pvt. Ltd., Pune. | 72,96,000/- | L2 |
| 03) | Windoors International Ltd., Mumbai. | 2,03,16,000/- | L3 |

उपरोक्त विषयांकीत कामाचे ई-निविदांचे तुलनात्मक तक्त्यानुसार याकामासाठी ठेकेदार वायएलडीए इंडिया प्रा. लि., पुणे यांचे दर निम्नतम आलेले आहेत.

मे.साराप्लास्ट प्रा. लि. पुणे यांनी त्यांचे हरकतीमध्ये नमूद केलेले मुद्दे व त्याविषयीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | उपस्थित मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| १. | पहिल्या वेळी राबविणेत आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये मे. वायएलडीए इंडीया प्रा. लि. यांना अपात्र ठरविण्यात आले होते. | वायएलडीए इं. प्रा. लि. यांनी पहिल्या वेळचे निविदा प्रक्रियेत तांत्रिक निविदेमध्ये इपीएफ नोंदणी विषयी कुठलेही कागदपत्र सादर केलेले नव्हते. त्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले. तथापी यावेळी फक्त दोनच निविदा सादरकर्ते पात्र ठरल्याने दुस-यांदा निविदा मागविणेत आल्या. |
| २. | वायएलडीए प्रा. लि. यांनी सादर केलेल्या तांत्रिक निविदेत त्यांनी केलेले काम/ अनुभव हा मे. जीआरबी इन्फास्ट्रक्चर यांच्या नावे असून ती स्वतंत्र Legal enitity आहे: | वायएलडीए इंडीया प्रा. लि. यांनी त्यांचे तांत्रिक निविदेत Goa State Infrastructure Development Corporation Limited (GSIDC) या संस्थेकरीता केलेल्या कामाचे पूर्णत्व प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्यामध्ये M/s. GRB Infrastructure यांनी सदरहु काम केलेले असून ते मे. वायएलडीए इंडीया प्रा. लि. यांचे अधिकृत वितरक असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामुळे सदरहु अनुभवाचे प्रमाणपत्र पात्रतेसाठी ग्राह्य धरण्यात आलेले आहे. याबाबत श्री. मोहित मल्होत्रा, Director, YLDA India Pvt. Ltd. यांचेशी चर्चा केली असता त्यांनी खालिल कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या असून त्या सोबत अवलोकनार्थ जोडल्या आहेत.<br>१) M/s YLDA India Pvt. Ltd; व M/s GRB Infrastructure यांचे दरम्यान झालेला करारनामा:- यावरुन असे दिसून येते की, YLDA India यांनी delivery, Pick-up, maintenance, Cleaning Services and Stocking of portable toilets या सेवा पूरविण्याचे हक्क GRB Infrastructure यांना दिले आहेत. व त्यांची Service Provider म्हणून नेमणूक केली आहे.<br>२) Antonella Diana, CEO, YLDA Group S.P.A. यांनी दिलेला दाखला दि. २२/०७/२०१५:- याव्दारे असा दाखला दिला आहे की, Sebach S. R. L. ही इटली या देशातील सर्वात मोठी पोर्टेबल टॉयलेट सेवा देणारी कंपनी असून ती YLDA Group S.P.A. यांचे मालकीची आहे.<br>YLDA Group S.P.A. यांनी फेब्रुवारी २०/३ मध्ये YLDA |

| | | |
|---|---|---|
| | | India Pvt. Ltd. ही उपकंपनी स्थापन केली आहे.<br>Sebach S.R.L. यांनी सन-२०१४ मध्ये इटली येथिल पोर्टेबल टॉयलेटसचे खालिल सेवा प्रकल्प केलेले आहेत.<br>**a)** Agesci (Italian guides and scouts association): a 4 days event held in San Rossore (PI) in August 2014 with: 1) 1508 Toilets 2) 762 Showers 3) 100 handwashes.<br>**b)** Italian Alpine troops muster: a 3 days event from the 15th to the 17th of May 2015 held in Aquila with: 1) 628 Toilets 2) 35 Wheelchair accessible toilets 3) 40 waste tanks 4) 24 Containers<br>याबाबत Sebach Ltd. यांनी AGESCI यांचेशी केलेल्या Lease Agreement ची प्रत सादर केली आहे. त्यानुसार सदर भाडेतत्वावर पोर्टेबल टॉयलेटस् कामाची किंमत ८,४१,८००:०० Euro इतकी आहे. प्रचलित विनिमय दराने भारतीय रुपयातील सदर किंमत रु. ५,८९,२६,०००/- मात्र इतकी होते. |
| ३. | दुस-यावेळी रावविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये M/s. YLDA यांनी सादर केलेल्या तांत्रीक निविदेत ईपीएफ नोंदणीकरीता अर्ज सादर केल्याचे नमूद केले आहे: | M/s. YLDA यांनी सदर तांत्रीक निविदेत ईपीएफ नोंदणीकरीता सादर केलेल्या अर्जाची प्रींट आऊट जोडलेली आहे. तसेच दि.०८/०७/२०१५ रोजी तांत्रीक निविदा उघडणेत आल्या त्यावेळी उपस्थित असलेल्या M/s.YLDA यांचे प्रतिनिधी श्री.देशपांडे यांनी त्यांना ईपीएफ चा कोड नंबर प्राप्त झालेला असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांना पात्र ठरविण्यात आले. याबाबत ईपीएफ कार्यालयाकडून दि.०७/०७/२०१५ रोजी त्यांना प्राप्त झालेल्या ई-मेलची प्रत सादर केली असून त्याची प्रींट सोबत अवलोकनार्थ जोडली आहे. |

सदर कामासाठीची मंजूर अंदाजपत्रकिय रक्कम रु.६६,३६,०००/- मात्र इतकी आहे. ठेकेदार मे. वायएलडीए इंडीया प्रा. लि. दिल्ली यांचे निविदा दर रु.६१,४४,०००/- मात्र इतके आहेत. व या कामामध्ये त्यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. तसेच साराप्लास्ट प्रा. लि. पुणे यांचे दर रु.७२,९६,०००/- मात्र इतके आहेत. तसेच निम्नतम निविदा सादरकर्ते YLDA India यांचे दरापेक्षा साराप्लास्ट प्रा. लि. यांचे दर रु. ११,५२,०००/- मात्रने जास्त आहेत.

वरीलप्रमाणे विवेचन व संबंधीत कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, YLDA India Pvt. Ltd. यांची मुख्य कंपनी YLDA Group S.P.A. ही बहुराष्ट्रीय कंपनी असून त्यांना इटली या देशातील अशा पध्दतीचे मोठया स्वरुपाचे कामाचा अनुभव आहे. तसेच YLDA India यांनी EPF code No. प्राप्त केलेला आहे. त्यांचे निविदा दरही निम्नतम स्वरुपाचे असून मंजूर अंदाजपत्रकिय रकमेपेक्षा कमी आहेत. विषयांकित काम हे तातडीचे असून सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीपुर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे.

तरी मे.साराप्लास्ट प्रा.लि., पुणे यांचे वरील संदर्भिय दि. ०९/०७/२०१५ रोजीचे पत्रातील हरकतींबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावावरुन असे दिसून येते की, वायएलडीए प्रा. लि., पुणे यांचे निविदेतील अटी/ शर्तीनुसार निविदेच्या तारखेस Certificate of registration नव्हते, की जी मूळ अट आहे तसेच स्वत:चे अनुभवाचा दाखला दिलेला नाही व दिलेल्या दाखल्याबाबत समितीचे समाधान होत नाही. याबाबतची छाननी तांत्रिक निविदा प्रक्रियेचे वेळेस होणे आवश्यक होते. परंतु संबंधीतांनी या गोष्टी निदर्शनास आणून दिल्या नाहीत, याकरिता तांत्रिक बाबीची सदोष छाननी केलेबद्दल छाननी करणारे अधिकारी व इतर कर्मचारी यांचेकडून खुलासा मागविणेत यावा.**

**तसेच प्रस्तावित काम सिंहस्थ कुंभमेळयाचे कालावधीसाठी चालू असल्यामुळे विशिष्ट परिस्थिती व येणा-या भक्तांची गैरसोय लक्षात घेता, या अल्पावधीत नवीन निविदा मागविणे शक्य नाही व सिंहस्थ कुंभमेळयाचे वेळी भक्तांची गैरसोय होवू नये म्हणून समितीने असा निर्णय घेतला की, प्रस्तावित द्वितीय व तृतीय निम्नतम दरधारकांच्या निविदेमधील तांत्रिक बाबी तपासून घेण्यात याव्यात व त्यांना कार्यकारी अधिकारी यांचेसमोर बोलविणेत येऊन, निम्नतम दरधारकानी दिलेल्या दरामध्ये सदरहू काम करणेस तयार आहेत का याची विचारणा करणेत यावी.**

**याप्रमाणे कार्यवाही करुन सविस्तर प्रस्ताव तयार करणेत यावा व त्या प्रस्तावास चक्रीय पध्दतीने समितीची मान्यता घेऊन, सदरहू काम चालू करावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.११ जुने प्रसादालय परिसरात विस्तारीत दर्शन रांगेकरीता एम.एस. वॉकर रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेबाबत.**

**प्रस्ताव-** नशिक सिहस्थ कुंभमेळा सन 2015 मध्ये दिनांक 27 ऑगष्ट 2015 ते 26 सप्टेंबर, 2015 या कालावधीत शिर्डी येथे भाविकांची प्रंचड गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकामी करावयाच्या कार्यवाहीसाठी संस्थानचे संबंधीत विभागांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाचा एकत्रित प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील

निर्णय क्र.6 अन्वये तसेच त्यानुसार नियोजित कामासाठी येणा-या अंदाजे रुपये 57,54,80,000/- मात्रचे खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक 06/05/2015 रोजी दिलेल्या आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. सिहस्थ कुंभमेळा कालावधीत जुने प्रसादालय इमारतीत करावयाच्या अतिरिक्त दर्शन रांगेसाठी रुपये 1,10,70,000/- मात्रचे खर्चास व सदरहु खर्च कुंभमेळाकरीता मा. उच्च न्यायालयाने परवानगी दिलेल्या रुपये 57.54 कोटी मात्र या अपेक्षित खर्चापैकी होणारे संभाव्य बचतीतून करणेस आणि याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळालेली आहे.

मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेनुसार जुने प्रसादालय परिसरात विस्तारीत दर्शन रांगेकरीता प्रत्येकी 12 फुट लांबीच्या 625 नग रेलींग असे एकूण 7500 रनिंग फुट लांबीचे एम.एस. वॉकर रेलिंग तयार करुन बसविणेकामी इकडील विभागामार्फत DSR दर व सध्याचे मटेरिअलचे स्थानिक मार्केट दरानुसार रुपये 41,62,440/- रकमेचे इस्टीमेंटनुसार निविदा तयार करुन, संस्थान संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून, याकामी खालीलप्रमाणे निविदाधारकांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत:

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | मे. श्री गिरीराज इंडस्ट्रीज, वापी |
| 2. | मे. रविंद्र रबर ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर |
| 3. | मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर, नाशिक |
| 4. | मे. अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद |
| 5. | मे. साई इंजिनिअर्स, नाशिक |
| 6. | मे. चंद्रगुप्त कंन्स्ट्रक्शन, साकुरी |

वरीलप्रमाणे विषयांकित कामांसाठी प्राप्त झालेल्या 6 (सहा) ई-निविदांचा लिफाफा क्रमांक 1 (टेक्नीकल बीड) दिनांक 01/07/2015 रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, प्राप्त कागदपत्रांची छाननी केल्यानंतर त्यामध्ये सर्व सहाही निविदाधारक पात्र झालेले आहेत.

वरीलप्रमाणे सहा प्राप्त निविदाधारकांचे कमर्शियल बीड दिनांक 01/07/2015 रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रुपये |
|---|---|---|
| 1. | मे.श्री गिरीराज इंडस्ट्रीज, वापी | 53,89,601.60 |
| 2. | मे.रविंद्र रबर ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर | 38,03,791.00 |
| 3. | मे.प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर, नाशिक | 35,42,560.00 |
| **4.** | **मे.अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद** | **32,59,560.00** |
| 5. | मे.साई इंजिनिअर्स, नाशिक | 34,76,000.00 |
| 6. | मे.चंद्रगुप्त कंन्स्ट्रक्शन, साकुरी | 33,64,900.00 |

उपरोक्त तपशीलानुसार विषयांकित कामांसाठी मे. अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी देऊ केलेले दर रक्कम रुपये 32,59,560/- हे DSR व इस्टीमेटपेक्षा कमी आहेत. त्यामुळे जुने प्रसादालय परिसरात विस्तारीत दर्शन रांगेकरीता एम.एस. वॉकर रेलींग तयार करुन बसविणेकामी मे. अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना कार्यादेश देणेस हरकत नाही. तरी मे. अपूर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचे निम्नतम दर स्विकारुन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४२ **उपरोक्त विषयावर दि.२७.०७.२०१५ रोजीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय क्र.२०९ झालेला असल्यामुळे सदरहू प्रस्ताव रद्द करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.१२ **मंजूर आकृतीबंधानुसार तयार केलेले सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्व प्रसिध्द करुन, हरकती मागवून अंतिम करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १३ (४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती यांच्या आस्थापनेवर आवश्यक कर्मचा-यांच्या आकृतीबंधास शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी एकूण ४८२६ (२९०८ स्थायी + १९१८ कंत्राटी) पदांस काही अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी दिलेली आहे.

अट-शर्त क्र.(१) समितीने पदनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

अट-शर्त (२) सेवा प्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवा प्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

शासनाने आकृतीबंधास मान्यता देताना पदनाम, पदसंख्या व पदाची वेतनश्रेणी याप्रमाणे संस्थानच्या आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये शासनाने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यास शासनाची मान्यता घेणेबाबत कळविलेले आहे. तसेच सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्य, पदोन्नतीची साखळी इत्यादी सर्व बाबी नमूद करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्यांनतर अधिनियमातील तरतुदींनुसार शासनाने नियम, विनियम, सेवाप्रवेश नियम अंतिम करणेकामी शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००८/१७७/(८१)/का.सोळा मंत्रालय, मुंबई-३२ दि.०३/१२/२००८ व निर्णय क्रमांक-सासंवि-२००८/ १७७/(८१)/का.सोळा मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४/०२/२०११ अन्वये मा.सह सचिव, कार्यासन सोळा, विधी व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दि.२८/०२/२०११, ०१/०३/२०११, १२-१३/०५/२०११, १८/०५/२०११, ७-८/०७/२०११ आणि ६-७/०१/२०१२ रोजी शासन स्तरावर बैठका घेण्यात येऊन विनियम, नियम तसेच सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करुन शासनास मान्यतेसाठी सादर केले होते.

शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१२/प्र.क्र.१९/पुर्नबांधणी-७/का.सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.२८ ऑक्टोबर, २०१३ अन्वये शासनाने खालील विनियमांना मान्यता दिलेली आहे.

१) Regulation for Meeting of the Committee
२) Regulation for Sub Committee
३) Advisory Council Regulations
४) Regulation for Scrutiny Committee
५) Bhakta Mandal Regulations
६) Service Regulations
i) General Conditions of Service Regulations
ii) Conduct Regulations
iii) Discipline and Appeal Regulations
iv) Leave Regulations
v) Joining Time & Payments during Suspension,Dismissal & Removal Regulations
vi) Pay and Allowances Regulations

तसेच सदर शासन निर्णयात (४) श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करण्यात यावे, असे कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासनाने मान्यता दिलेले विनियम अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन पुर्व प्रसिध्द करुन हरकती मागविणेचा विषय मा.त्रिसदस्य समिती दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेपुढे निर्णयासाठी सादर करण्यात आलेला होता. त्यावर समितीने खालीलप्रमाणे निर्णय क्र.९९३ घेतलेला आहे.

"महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेले विनियम दि.०१/०१/२०१५ पासून संस्थानसाठी लागू करणेत यावेत. तसेच, याबाबत कोणास हरकत घ्यावयाची असल्यास ते कायदेशीर हरकत नोंदवू शकतील, त्यासाठी संबंधीतांनी मागणी केल्यास त्यांना सदरहू सेवा विनियमाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी," असा निर्णय घेण्यात आला.
मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयास अनुसरुन शासनाने मान्यता दिलेले उपरोक्त विनियम जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/ ४४६०/ २०१४ दि.२७/१२/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थानसाठी दि.०१/०१/२०१५ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

त्यावर श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेने महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरोधात मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठात पीआयएल नं.११२६/२०१५ दि.२८/०१/२०१५ दाखल केलेले आहे. सदरची बाब ही न्यायप्रविष्ट असून न्यायालयाने अंतिम आदेश दिलेले नाहीत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतुद आहे.

२ (झ) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम, असा आहे.
११ (६) समितीस, आपल्या कार्यपध्दतीचे नियमन करण्यासाठी व कामकाज चालविण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदींशी आणि त्यातील नियमांशी सुसंगत होतील असे विनियम करता येतील.
**२५ (३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन असतील.**

परंतु, तातडीने कृती करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली तर, त्यास या अधिनियमाखाली करावयाचा कोणताही नियम, पूर्वप्रसिध्दीशिवाय करता येईल.

मंजूर आकृतीबंधातील तरतुदीस अनुसरुन संस्थान आस्थापनेवरील विविध पदे, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नतीची छाननी करुन, आवश्यक त्या दुरुस्त्या करुन मा.व्यवस्थापन समिती दि.१२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयान्वये जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि.२६/०६/२०१४ चे पत्रान्वये सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहेत. परंतु सदरचे सेवाविनियम हे अधिनियमातील तरतुदी नुसार पूर्व प्रसिध्द न करता तयार करण्यात आलेले आहेत.

तसेच महाराष्ट्र विधान मंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीने दि.१८ जून, २०१५ रोजी शिर्डी येथे दौरा करुन संस्थानचे पद भरती विषयी आढावा घेऊन संस्थानचे सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) तात्काळ मंजूर करणेबाबत शासनास पाठपुरावा करणेच्या सूचना दिलेल्या आहेत.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता, मंजूर आकृतीबंधानुसार मा.त्रिसदस्य समितीचे मान्यतेने जा.नं.एसएसएस/ वशी-०१/१४७०/२०१४ दि.२६/०६/२०१४ चे पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी पाठविलेले सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अधिनियमातील तरतुदीनुसार पूर्व प्रसिध्द करुन, कर्मचा-यांच्या हरकती मागवून तद्नंतर अंतिम प्रस्ताव पुनःश्च शासनास मान्यतेसाठी सादर करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंजूर आकृतीबंधानुसार तयार केलेले सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्व प्रसिध्द करुन, हरकती मागविणेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.१३ **पंजाब नॅशनल बँक, शाखा शिर्डी येथे संस्थानचे बचत खाते उघडणे व त्यांचेकडून संस्थानला सेवा घेणेबाबत**

प्रस्ताव- उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, पंजाब नॅशनल बँक, शाखा शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे बचत खाते त्यांचे बँकेत उघडणे, तसेच संस्थानचे आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगाने इतर सर्व बँक संदर्भातील सेवा त्यांचे बँकेमार्फत सुरू करणेबाबत विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-2004 मधील कलम 20 अन्वये संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवण्याचे बंधन आहे, व पंजाब नॅशनल बँक ही राष्ट्रीयकृत बँक आहे.

तथापी, सध्या साधारणत: 15 राष्ट्रीयकृत बँकांमध्ये संस्थानच्या नावाने बचत खाते उघडण्यात आलेले असून या सर्व बँका संस्थानला विनातक्रार सेवा पुरवित आहेत.

तरी पंजाब नॅशनल बँक, यांचे शिर्डी शाखेत संस्थानच्या नावाने बचत खाते उघडणेस व त्यांचेकडून इतर बँकांप्रमाणे त्यांचेकडून संस्थानला आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगिक सर्व सेवा-सुविधा घेणेस मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.२२४ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, पंजाब नॅशनल बँक ही राष्ट्रीयकृत बँक असल्यामुळे त्यांचे शिर्डी शाखेत संस्थानच्या नावाने बचत खाते उघडणेस व त्यांचेकडून इतर बँकांप्रमाणे संस्थानला आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगिक सर्व सेवा-सुविधा घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.१४ **सी.आय.एस.एफ. सेवा पुरविणे संदर्भात प्राप्त झालेले महानिर्देशक केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (गृहमंत्रालय) यांचे पत्राबाबत.**

प्रस्ताव- महानिर्देशक केंद्रीय औद्योगीय सुरक्षा बल (गृहमंत्रालय) यांनी संस्थानला खालील विषयी माहिती लवकरात लवकर पुरविणेबाबत कळविलेले होते.

1. Layout of area to be covered under Security and Fire Protection.
2. Building / Installations to be covered.
3. Major security threats perceived.
4. Vital / Critical installations.
5. Number of employees / staff and contractual laborers.
6. Number of visitors to be organization campus per day on an average.
7. Specific fields if any in which Consultancy Services are required.
8. Whether you would like to have a Fire Protection Audit and recommendations on Fire Protection as well.

त्याअनुषंगाने दि.23/04/2015 रोजी संस्थानचे श्री साईनिवास अतिथीगृह येथे सभा आयोजीत केली होती. सदर मिटींगमध्ये सी.आय.एस.एफ. यांचेकडून सुरक्षेसंदर्भात कन्सलटंन्सी घेणेबाबत चर्चा झाली असून, त्याबाबत त्यांनी प्रेझेंटेशन दिलेले आहे. व संस्थानला सी.आय.एस.एफ. मार्फत काय सेवा आवश्यक आहे याबाबत पत्र देणेबाबत चर्चा झाली. त्यानंतर सदरचे सी.आय.एस.एफ.चे अधिकारी यांनी संस्थानचे मंदिर परिसर, श्री साई प्रसादालय, साईप्रसाद नं.1, 2 साईबाबा धर्मशाळा, कनकुरी साठवण तलाव, साईनाथ हॉस्पीटल, द्वारावती भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईबाबा हॉस्पीटल या परिसराची पहाणी केलेली आहे. व त्याप्रमाणे त्यांना संदर्भ क्र.06 नुसार 01 ते 08 मुद्यांबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच सदर मुद्यांबाबतची माहिती जा.नं.एसएसएस/वशी/395/15 दि.24/04/2015 अन्वये महानिर्देशक केंद्रीय औद्योगीय सुरक्षा दल (गृहमंत्रालय) यांना कळविण्यात आलेली होती.

त्याप्रमाणे महानिर्देशक केंद्रीय औद्योगीय सुरक्षा दल (गृहमंत्रालय) यांचे W-42014 (4)/31/2014 Consultancy (Tech.DTE)/1138 दि.15/05/2015 रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

**त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे.**

1) "संस्थानने पुरविलेल्या माहितीवरुन आणि प्राथमिक मिटींगनुसार असे ठरविण्यात आले आहे की, सुरक्षा आणि फायर संबंधी सेवा पुरविणेबाबत आम्ही तयार आहोत. गृहमंत्रालयाच्या ठरविलेल्या सेवाशुल्कानुसार आम्ही रुपये 3,25,000/- सेवा शुल्क आकारत आहोत. कन्सल्टंन्सी सेवा पुरविणेबाबतच्या अटी आणि शर्ती **'भाग अ'** प्रमाणे आहे.

**भाग अ-अटी व शर्ती.**

सेवा शुल्क् अगोदर मिळाल्यानंतरच कन्स्◌ालटन्सी, सेवा देण्याची कारवाई सुरु होईल. त्यानंतर संपुर्ण भारत देशात विभिन्न्◌ा पदावर कार्यरत असलेल्या आमचे तज्ञांचे एक दल नियुक्◌्◌ा केले जाईल. हया दलाच्या प्रमुखास निर्देश दिले जातील की, त्यांनी ग्राहकांशी संपर्क साधून दिलेल्या स्थळाची पाहणी करण्यासाठी तारीख ठरवून नियोजन करणे आणी सदर कामाचा लेखाजोखा हा परस्परांशी ताळमेळ साधून तयार करणे, आमचे नियुक्◌्◌ा केलेले दल साधारणत: तिन ते चार अधिकारी आणि एक ते दोन सहाय्य्◌ाक कर्मचारी असे असेल. परंतू ज्या ठिकाणी कामाचे स्वरुप जास्त्◌ा असते अशा ठिकाणी दोन किंवा त्यापेक्षा जास्त्◌ा दल नियुक्◌्◌ा केले जातात. जेणेकरुन स्थ्◌ाळांची प्रत्य्◌ाक्षरित्या पाहणी करुन सुचना / सुझाव देता येतील. तुमच्या संस्थेकडून एका प्रतिनिधीची नियुक्ती करण्यात यावी जो आमच्या दलास हवी ती माहिती पुरविण्याचे काम करील.
सेवा शुल्काचा तपशिल खालीलप्रमाणे.

| स्थ्◌ाळ / स्थान | सेवेचा प्रकार | सेवा शुल्क् रक्कम |
|---|---|---|
| श्री साईबाबा संस्थान,शिर्डी | सुरक्षा कन्स्◌ालटन्सी | 2,50,000/- |
| | फायर कन्स्◌ालटन्सी | 75,000/- |
| | | 3,25,000/- |

तरी आपणास विनंत आहे की, जो विभाग आपणास सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशिल वाटतो त्याची माहिती आमच्या दलास प्राथमिक मिटींगमध्ये देण्यात यावी. आपल्याला अपेक्षित असलेले सर्व विभाग / स्थळांची माहिती आमच्या दलास देणे. कन्सलटंन्सी रिपोर्ट / अहवाल आपणास दिल्यानंतर त्यावर आपली प्रतिक्रीया घेतली जाईल.

वर नमुद केल्याप्रमाणे सेवाशुल्क् आकार हा फक्त् बँक ड्राफट The Accounts officer (Recovery) CISF, HQRS, New Delhi या नावाने S.B.I. नेहरु पॅलेस, नवी दिल्ली (Code-4688) येथे पाठविण्यात यावा.

2) तुम्ही दिलेल्या स्थानाला, सुरक्षा आणि फायर कन्स्◌ालटंन्सी सेवा पुरविणेबाबत आम्ही आमच्या अधिका-यांचा एक आयोग गठीत केला आहे. असे तुम्हाला कळविण्यात येत आहेत. सेवाशुल्क् पोहचल्यानंतर याची कार्यपध्दती सुरु होईल.

3) सी.आय.एस.एफ. बरोबर बोलणी करण्यासाठी तुमचा एक प्रतिनीधी नेमावा ज्यांचे संपर्क पत्ता आणि मोबाईल नंबर कळवावा. आम्ही आपले जा.नं.एसएसएस/वशी/395/15 दि.24/04/2015 रोजीचे पत्र आमचे नियोजन विभागास पडताळणी आणि पुढील कारवाईसाठी पाठविलेले आहे, असे त्यांनी कळविलेले आहे.

4) ग्राहकाने दिलेल्या दरानुसार सर्व्हीसेस टॅक्स्◌ा / सेवा आकार भरुन त्याची माहिती आम्हाला द्यावी. कृपया याची नोंद घ्यावी की, कन्स्◌ालटंन्सी सेवाशुल्क् जे सी.आय.एस.एफ.ला दिलेले आहे. ते सरकारी खात्यातच जमा होतील आणि हे कुठलेही प्रकारचे व्यक्तीगत पेमेंट नाही. म्हणूनच आयकर विभाग नियम क्र.196 प्रमाणे हया पेमेंटवर कुठल्याही प्रकारचा आयकर (TDS) आकारु नये. आमचा TAN No. DELD 08212B असा आहे.

तरी महानिर्देशक केंद्रीय औद्योगीक सुरक्षा दल (गृहमंत्रालय) यांचे W-42014(4)/31/2014 Consultancy (Tech.DTE)/1138 दि.15/05/2015 रोजीचे पत्रानुसार...

A. सी.आय.एस.एफ. यांचे पत्रातील कन्स्◌ालटंन्सी बाबतच्या अटी व शर्तीचे अवलोकन होऊन चर्चा होणे आवश्यक आहे.

B. महानिर्देशक केंद्रीय औद्योगीक सुरक्षा दल यांचे पत्राप्रमाणे सी.आय.एस.एफ.बरोबर बोलणी करण्यासाठी संरक्षण अधिकारी यांना नियुक्◌्◌ा करणेत येईल. त्यास मान्य्◌ाता असावी.

C. सुरक्षा कन्स्◌ालटंन्सीकामी रु.2,50,000/- मात्र व फायर कन्स्◌ालटंन्सीकामी रु.75,000/- मात्र असे एकुण रु.3,25,000/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरची सेवाशुल्क् हे त्यांचे पत्राप्रमाणे बँक ड्राफटद्वारे The Accounts Officer (Recovery) CISF, HQRS, New Delhi यांच्या नावाने S.B.I. नेहरु पॅलेस, नवी दिल्ली (Code-4688) येथे पाठविण्यास मान्यता असावी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त्◌ाव्यवस्था शिर्डीचे सुरक्षा आणि फायर कन्स्◌ालटंन्सी सेवा पुरविणेबाबत अधिका-यांचा एक आयोग गठीत केला आहे. तथापी सेवाशुल्क् पोहचल्यानंतर याची कार्यपध्दती सुरु होईल, असे त्यांनी पत्रात नमूद केलेले असल्याने त्यांचे मार्फत कन्स्◌ालटंन्सी सेवा घेणेकामी वरील A,B व C या मुद्यावर चर्चा होऊन निर्णय होणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, महानिर्देशक केंद्रीय औद्योगीय सुरक्षा बल (गृहमंत्रालय) यांचेकडून संस्थानला सुरक्षा व फायर कन्सल्टंसी सेवा घेणेत यावी, असे ठरले.**

**तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं.१५ **पोलिस निरिक्षक साई मंदिर सुरक्षा यांना पोलिस कर्मचारी यांचे करीता तंबु (राहुटी) लावणेची परवानगी देणेबाबत**

प्रस्ताव- पोलिस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा शिर्डी यांनी त्यांचे जा.नं.156/2015 दि.15/07/2015 रोजीचे श्री साईबाबा मंदिर, शिर्डी येथे सिंहस्थ्◌ा कुंभमेळा बंदोबस्त्◌ाकामी पोलिस कर्मचा-यांची प्रत्येक गेटवर डे-नाईट दैनंदिन डयुटी लावण्यात

आली असून उन, वारा व पाऊस यापासुन संरक्षण व कर्मचा-यांना बसण्याकरीता प्रत्येक गेटवर मोकळया आतील जागी तंबु (राहुटी) लावण्याची परवानगी मागीतली आहे.

तसेच जा.नं.274/2015 दि.24/07/2015 रोजीचे पत्रात कुंभमेळा व गुरुपौर्णिमा उत्स्‍वकामी दक्षिण गेट नं.04 येथे आतील बाजुस बंदोबस्‍त पोलिस कर्मचाऱ्यांकरीता एक सरकारी पोलिस राहुटी आम्ही लावणार आहोत, ती लावणे अत्यंत आवश्य्‍क आहे. सदर ठिकाणी दिवस / रात्र पाळीमध्ये 01 पोलिस हेड कॉन्टेबल व 3 पोलिस कॉन्टेबल यांची आर्म गार्ड लावण्यात येणार आहे. त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने राहुटी लावणे आवश्य्‍क आहे. तरी परवानगी मिळणेस विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने दि.24/07/2015 रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी सो. संरक्षण विभागातील लिपीक श्री विलास कोते, मंदिर सुरक्षाचे पोलिस निरीक्षक श्री वाखारे सो. इतर पोलिस कर्मचारी यांचे समवेत राहुटी लावणेबाबत मंदिर परिसरात राऊंड घेतला असता. मंदिर परिसराचे आतील बाजूस पोलिस कर्मचाऱ्यांसाठी राहुटी लावणेकामी जागा नसल्यामुळे पोलिस निरीक्षक श्री वाखारे सो. यांनी द्वारकामाई मंदिरासमोरील मोकळी जागा सुचविली असता मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी सदर जागा ही संस्थान मालकीची नसल्यामुळे सदर जागेवर राहूटी लावण्याची परवानगी देता येणार नाही. तथापी द्वारकामाई समोरील रिकाम्या जागेच्या दक्षिणेकडील असलेले नाटयगृहाचे इमारतीतील काही भाग पोलिस कर्मचारी यांना राहुटी लावण्यासाठी देऊ शकतो. त्यावर श्री वाखारे सो. यांनी नाट्यगृहाचे इमारतीतील जागेबाबत नकार दर्शविला.

तसेच गेट नं.04 चे आतील बाजूस गेटच्या पश्चिम बाजूस असलेल्या मोकळया जागेत श्री वाखारे सो. यांनी राहूटी लावणेस जागेची मागणी केली आहे. त्यानुसार आमचे असे नम्र मत आहे की, गेट नं.04 हे इन-आऊट गेट असल्यामुळे सदर गेटमधून मंदिर परिसरात आत येणारे व बाहेर जाणाऱ्या साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण जास्‍त असते. त्याचप्रमाणे सदर गेटमधून शहराच्या दक्षिण बाजूकडील सर्व खाजगी रुम घेऊन थांबणारे साईभक्‍त दर्शनाच्या रांगेसाठी व दर्शन करुन बाहेर पडण्यासाठी गेट नं.04 चा उपयोग करतात.

तरी पोलिस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा यांचे मागणीप्रमाणे मंदिर परिसरात सर्व गेट व गेट नं.04 चे आतील बाजूस राहूटी लावणेबाबत परवानगी द्यावी किंवा कसे याबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, पोलिस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा यांचे मागणीप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळयामध्ये तात्पुरत्या कालावधीसाठी मंदिर परिसराचे सर्व गेट व गेट नं. ०४ चे आतील बाजूस पोलिस कर्मचा-यांकरीता तंबू (राहुटी) लावणेस परवानगी देण्यात यावी व कुंभमेळयाचा कालावधी संपल्यानंतर सदरहू तंबू काढून घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं.१६ **पोलिस निरिक्षक साई मंदिर सुरक्षा यांना आर्म ॲम्युनेशन ठेवणेकामी रुम व फर्निचर देणेबाबत**

प्रस्ताव- गुरुवार दि.23/07/2015 रोजी मा.अध्यक्ष सो. मा.जिल्हाधिकारी सो. मा.पोलिस अधिक्षक सो., मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे झालेल्या सभेमध्ये मंदिर सुरक्षा विभागास तात्पुरत्या स्वरुपात मंदिर परिसरात आर्म ॲम्युनेशन ठेवणेकामी एक रुम देण्यात यावी असे ठरले आहे.

त्यानुसार पोलिस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा शिर्डी यांनी त्यांचे जा.नं.274/2015 दि.24/07/2015 रोजीचे पत्रात नमुद केले आहे की, क्रमांक कक्ष-1(4) पो अ/इमारत-1/6133/2014 अहमदनगर दि.27/08/2014 सा.मं.सुरक्षा शिर्डी जावक क्र.103/2014 दि.26/03/2014 अन्वये यापुर्वी रुम मिळणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे. तरी आर्म ॲम्युनेशन ठेवण्यासाठी जुनी उदीकाऊंटरची रुम रंगकाम कलर करुन व फर्निचरसह देण्यात यावी 02 टेबल, 02 व्ही.आय.पी.खुर्च्या, 10 लोखंडी बेंच, 02 कपाटे, 10 फायबर खुर्च्या मिळणेबाबत विनंती आहे.

दि.24/07/2015 रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी सो., संरक्षण विभाग लिपीक श्री विलास कोते, मंदिर सुरक्षाचे पोलिस निरीक्षक श्री वाखारे सो. व इतर पोलिस कर्मचारी यांचे समवेत राऊंड घेतला असता श्री वाखारे सो. पोलिस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा यांनी कुंभमेळयाचे बंदोबस्तासाठी तात्पुरत्या स्वरुपात आर्म ॲम्युनेशन ठेवण्यासाठी मंदिर परिसरात राऊंड घेतला असता श्री वाखारे सो. यांनी उपकार्यकारी अधिकारी सो. यांचेकडे गेट नं.04 समोरील जुनी उदी काऊंटरची रुमची व त्यामध्ये आर्म ॲम्युनेशन ठेवणेकामी 02 कपाट, 01 टेबल व 01 खुर्चीची मागणी केली. परंतू सा.प्र.आ.नं.7864 दि.25/07/2015 रोजीच्या पत्राने आर्म ॲम्युनेशन ठेवण्यासाठी जुनी उदी काऊंटरची रुम रंगकाम कलर करुन व फर्निचरसह देण्यात यावी. 02 टेबल, 02 व्ही.आय.पी.खुर्च्या, 10 लोखंडी बेंच, 02 कपाटे, 10 फायबर खुर्च्यांची मागणी केलेली आहे.

**तरी...**

01. पोलिस निरीक्षक साई मंदिर सुरक्षा यांचे मागणी प्रमाणे आर्म ॲम्युनेशन ठेवण्यासाठी तात्पुरते स्वरुपात गेट नं.04 समोरील जुनी उदी काऊंटरची रुम देणेस मान्यता असावी.

02. पोलिस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा यांनी कार्यालयीन कामकाजासाठी मागणी केलेप्रमाणे कपाट 02 नग, ऑफीस टेबल 02 नग, व्ही.आय.पी.खुर्ची 02 नग, लोखंडी बेंच 10 नग व फायबर खुर्ची 10 नग देणेकामी अंदाजे रु.1,00,000/- खर्च अपेक्षित आहे. सदर फर्निचर विहीत पध्दतीने खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रु.1,00,000/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.२२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, पोलिस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा यांचे मागणीनुसार सिंहस्थ कुंभमेळयामध्ये तात्पुरत्या कालावधीसाठी आर्म ॲम्युनेशन ठेवणेकामी मंदिर परिसरामध्ये खोली व प्रस्तावात नमुद केलप्रमाणे फर्निचर उपलब्ध करुन द्यावे व कुंभमेळयाचा कालावधी संपल्यानंतर सदरहू खोली संस्थानच्या ताब्यात घेण्यात यावी, असे ठरले.

**तसेच प्रस्तावित फर्निचर खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं.१७ **व्हिजीटींग पध्दतीने नेत्ररोग तज्ञाची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन निर्णय क्रसासवि-2009/433/(37/09) का सोळा मंत्रालय मुंबई दि. 07/08/2009 नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटी शर्ती क्र 3 सदर पदांवर नव्यानेनियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे नमूद केले आहे.

तसेच मा मुंबई उच्च न्यायालयाचे दि. 16/10/2012 रोजीचे आदेशातील अ.नं.6 मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात नेत्ररोग तज्ञाची 3 पदे मंजूर असुन एकही पद भरलेले नाही तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधात नेत्ररोग तज्ञाचे 1 पदे मंजूर असुन सदर पदावर डॉ मनिषा आग्रवाल यांना नेमणूक देण्यात आलेली आहे परंतु सध्या त्या बाळंतपणाचे रजेवर आहेत. तसेच नेत्र विभागात डॉ सुनिल सोनटक्के, आरएमओ हेही काम करत आहेत.

रिक्त आवश्यक पदांवर नेमणूका करणेबाबत सिव्हील ॲप्लिकेशन दाखल केलेले आहे परंतु या कार्यवाहीस बराचसा कालावधी लागणार आहे.

डॉ पराग तुपे यांनी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये नेत्ररोग तज्ञ पदावर व्हीजिटींग पध्दतीने आठवड्यातुन एक दिवस (गुरुवार) विनामोबदला सेवा देणेकामी अर्ज केलेला आहे.

सबब, साईनाथ रुग्णालयातील नेत्र विभागाकडील कामाचा प्रचंड व्याप विचारात घेता डॉ पराग तुपे यांना विनामोबदला नेत्ररोग तज्ञ म्हणून व्हीजिटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी देता येईल असे मत आहे.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.२२८ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ रुग्णालयातील नेत्र विभागाकडील कामाचा प्रचंड व्याप विचारात घेता डॉ.पराग तुपे यांना पुढील आदेश होईपर्यंत विनामोबदला नेत्ररोग तज्ञ म्हणून व्हीजिटींग पध्दतीने सेवा करण्याची तात्पुरती परवानगी देण्यात आली.**

**तसेच या सेवेमुळे त्यांना कुठलेही अधिकार प्राप्त होणार नाहीत व त्यांनी या सेवेचा स्वत:च्या खाजगी व्यवसायासाठी गैरवापर करु नये, गैरवापर झाल्याचे निदर्शनास आले तर त्यांची विनामोबदला सेवा तात्काळ बंद केली जाईल, असे त्यांना कळविण्यात यावे.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१८ **व्हिजीटींग पध्दतीने स्त्री रोग तज्ञाची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन संदर्भ क्रसासवि-2009/433/(37/09) का सोळा मंत्रालय मुंबई दि. 07/08/2009 नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटीशर्ती क्र 3 सदर पदांवर नव्यानेनियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे नमूद केले आहे.

तसेच मा मुंबई उच्च न्यायालयाचे दि. 16/10/2012 रोजीचे आदेशातील अ.नं.6 मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधात स्त्रीरोग तज्ञाचे एक पद मंजूर असुन सदरचे पद भरलेले आहे व श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात 4 स्त्री रोग तज्ञाचे पदे मंजूर असून चारही पदे रिक्त आहेत. आकृतीबंधात सदर पदासाठी एमडी/डीएनबी/एमएस अशी शैक्षणिक अर्हता आहे.

सध्या स्त्रीरोग तज्ञ पदावर असलेले वैद्यकीय आजारी रजेवर असुन ते यापुढेही रजा वाढविणार असल्याचे त्यांनी दुरध्वनीद्वारे कळविले आहे. त्यामुळे सदर विभागात कार्यरत असलेले आरएमओ यांचेवर अतिरिक्त कामाचा भार वाढलेला आहे व सध्या असलेल्या आरएमओ यांनी 24 तास ऑनकॉल राहण्यास असमर्थता दर्शविली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात प्रसुति विभागात येणाऱ्या अति गंभीर गरोदर मातांना इतरत्र रुग्णालयांमध्ये हलवावे लागेल यासाठी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये स्त्रीरोग विभागात एक स्त्रीरोग प्रसुती तज्ञाची तातडीने नेमणूक करावी इ बाबत दि. 27/05/2015 रोजीचे पत्रान्वये वैद्यकीय अधिक्षक श्री साईनाथ रुग्णालये यांनी कळविले आहे.

डॉ अमोल पोकळे, एमबीबीएस डीजीओ हे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये आरएमओ पदावर कार्यरत असतांना त्यांनी प्रसूती विभागात काम केलेले आहे नंतर त्यांनी राजीनामा दिल्याने त्यांचे नाव हजेरी पटावरुन कमी करणेत आले

होते. आता त्यांनीदि. 19/06/2015 रोजीचे अर्जान्वये साईनाथ रुग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने 2 दिवस ओपीडी व 2 दिवस ऑपरेशन थिएटरमध्ये सेवा देण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सध्या श्री साईनाथ रुग्णालयात पदवीधारक व्हिजीटींग वैद्यकीय अधिकारी यांना रु 5000/- प्रति व्हिजीट मानधन देण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकडील स्त्री विभागात स्त्रीरोग तज्ञाची तातडीने आवश्यकता असल्याने डॉ अमोल पोकळे, एमबीबीएस डीजीओ यांना व्हिजीटींग पध्दतीने वैद्यकीय अधिक्षक यांनी दि 20/06/2015 पासून कामावर हजर करुन घेतले आहे.

सबब डॉ.अमोल पोकळे, एमबीबीएस डीजीओ (डीप्लोमाधारक) यांचे व्हिजीटींग पध्दतीने एक वर्ष किंवा स्थायी कर्मचाऱ्याची नेमणूक यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रति व्हिजीट रु 2500/- प्रमाणे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.अमोल पोकळे, एमबीबीएस डीजीओ (डीप्लोमाधारक) यांच्या श्री साईनाथ रुग्णालयामध्ये व्हिजीटींग पध्दतीने स्त्रीरोग तज्ञ म्हणून, व्हिजीट दिलेल्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५००/- मात्र मानधनावर तात्पुरत्या केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१९ **व्हिजीटींग पध्दतीने न्युरोलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- शासन संदर्भ क्रसासवि-2009/433/(37/09) का सोळा मंत्रालय मुंबई दि. 07/08/2009 नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटीशर्ती क्र 3 सदर पदांवर नव्यानेनियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे नमूद केले आहे.

तसेच मा मुंबई उच्च न्यायालयाचे दि. 16/10/2012 रोजीचे आदेशातील अ.नं.6 मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात न्युरोलॉजीस्टची दोन पदे मंजूर आहेत. न्यूरोलॉजीस्टची पदे भरणेकामी वेळोवेळी जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली आहे परंतु सदर पदावर उमेदवार मिळू न शकल्याने ती दोन्ही पदे अद्यापावेतो रिक्त आहेत

दि. 24/07/2011 रोजीचे मा व्य समितीचे निर्णय क्र 575 अन्वये डॉ सुहास पाटील यांची श्री साईबाबा रुग्णालयात व्हीजिटींग पध्दतीने नेमणूक करून त्यांना इतर वैद्यकीय अधीकाऱ्याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता (Incentive) देण्यात येत होता. दि.28/11/2013 रोजीचे अर्जान्वये त्यांनी रू. 10000/- +EEG वर मिळणाऱ्या प्रोत्साहन भत्याची मागणी केली होती सदरचा विषयावर दि. 05/06/2014 रोजीचे मा व्य समितीत चर्चा होऊन निर्णय क्र 342 नुसार डॉ पाटील यांनी अवास्तव मागणी केली आहे त्यामुळे सदर प्रस्ताव अमान्य करणेत आला.

आता डॉ श्रीपल शैलेश शाह, डी एम (न्यूरोलॉजी) यांनी त्यांचे दि. 20/04/2015 रोजीचे अर्जान्वये त्यांचा सीव्ही श्री साईबाबा रुग्णालयाकडे सादर केला असुन त्यात प्रति व्हिजीट रु. 7000/- मानधन तसेच ओपीडी, आयपीडी व ईईजी/ईएमजीसाठी (इन्सेंटीव्ह) प्रोत्साहन भत्याची मागणी केलेली आहे.

सध्या श्री साईनाथ रुग्णालयातील व्हीजिटींग वैद्यकीय अधीकाऱ्याना (ईएनटी) प्रति व्हीजिट रु 5000/- व श्री साईबाबा रुग्णालयातील व्हीजिटींग वैद्यकीय अधीकाऱ्याना (व्हीजिटींग कार्डीयालॉजीस्ट) फक्त प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे.

सबब, न्यायालयाचे आदेशानुसार रिक्त पदे भरणेसाठी काहीसा कालावधी लागणार असल्याने तसेच साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या विचारात घेता डॉ श्रीपल शाह यांना न्युरोलॉजीस्ट म्हणून व्हीजिटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी देता येईल. तथापि डॉ शाह यांनी मागणी केलेप्रमाणे मानधन व प्रोत्साहन भत्तादिला तर साईबाबा रुग्णालयातील इतरही व्हीजिटींग वैद्यकीय अधीकारी त्याप्रमाणे मागणी करतील असे मत आहे.

तथापि एक विशेष बाब म्हणून डॉ श्रीपल शैलेश शाह यांना मानधन रु 5000/- प्रतिदिवस तसेच इतर वैद्यकीय अधीकाऱ्यांप्रमाणे (इन्सेंटीव्ह) प्रोत्साहन भत्ता देता येईल, असे मत आहे.

निर्णय क्र.२३० **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, न्यायालयाचे आदेशानुसार रिक्त पदे भरणेसाठी काहीसा कालावधी लागणार असल्याने तसेच साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या विचारात घेता डॉ.श्रीपल शाह यांना श्री साईबाबा हॉस्पिटलकडे न्युरोलॉजीस्ट म्हणून व्हीजिटींग पध्दतीने तात्पुरत्या कालावधीसाठी सेवा करण्याची संधी देण्यात यावी. तसेच एक विशेष बाब म्हणून डॉ.श्रीपल शैलेश शाह यांना प्रतीदिन रु.5000/- मात्र मानधन व इतर वैद्यकीय अधीकाऱ्यांप्रमाणे (इन्सेंटीव्ह) प्रोत्साहन भत्ताही देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.२० **श्री साईनाथ रुग्णालयात सोनोलॉजीस्ट पदावर एक कुशल कंत्राटी कर्मचारी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- डॉ राम शंकर महाजन हे श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजीस्ट) या पदावर कार्यरत होते. ते सेवानिवृत्त झालेनंतर त्यांना मा व्यवस्थापन समिती सभा दि १५/०९/२०१२ रोजीचे निर्णय क्र ७५२ नुसार दि

०१/०९/२०१२ पासुन श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजीस्ट) या पदावर कंत्राटी पध्दतीने एकत्रित मासिक मानधन रु ३५०००/- वर सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली.

मा व्यवस्थापन समिती सभा दि ०७/०२/२०१३ रोजीचे निर्णय क्र १०९ नुसार डॉ राम शंकर महाजन यांना कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजीस्ट) या पदावर दि ०१/०३/२०१३ पासून सहा महिने कालावधी करीता पुर्वीच्याच अटी / शर्तीवर रु ३५०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर नेमणूक देण्यात आली.

मा व्यवस्थापन समिती सभा दि २४/०८/२०१३ रोजीचे निर्णयानुसार डॉ राम शंकर महाजन यांची कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजीस्ट) या पदावर दि ०१/०९/२०१३ पासून सहा महिने कालावधी करीता पुर्वीच्याच अटी / शर्तीवर रु ३५०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर नेमणूक देण्यात आली.

मा व्यवस्थापन समिती सभा दि. ०७/०८/२०१४ रोजीचे निर्णय क्र ६७३ नुसार सोनोलॉजीस्टची सेवा तातडीची वैद्यकिय सेवा असल्यामुळे व रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता संस्थानला कंत्राटी कुशल / अकुशल कर्मचारी पुरविणा-या मे बीव्हीजी इंडिया लि पुणे या कॉन्ट्रॅक्टरमार्फत डॉ महाजन, सोनोलॉजीस्ट यांना दरमहा एकत्रित रु ५४०००/- मात्र मानधनावर ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून नेमणूक देण्यात आली तसेच दरम्यानचे कालावधीत जाहिरात प्रक्रियेद्वारे सोनोलॉजीस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास डॉ महाजन यांना देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात आणणेत यावी असे ठरले त्यानुसार त्यांना देणेत आलेला नेमणूक कालावधी दि ०४/०७/२०१५ अखेर संपुष्टात येत आहे.

दि. २३/०४/२०१५ रोजीचे अर्जान्वये डॉ महाजन यांनी मुदतवाढ व पगारवाढ मिळणेकामी अर्ज केला आहे.

मा उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सिव्हील अॅप्लीकेशन नं ९४१९/२०१३ वर दि १३/०८/२०१३ चे आदेशान्वये जाहिरातीद्वारा रिक्त पदे भरणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर रिक्त पदांमध्ये सोनोलॉजीस्ट पदाचा समावेश आहे. आताही जाहिरातीमार्फत पदभरतीसाठी काहीसा कालावधी लागणार असल्याने तसेच सोनोलॉजीस्टची सेवा तातडीची वैद्यकिय सेवा असल्यामुळे व रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता डॉ महाजन, सोनोलॉजीस्ट यांना पुर्वीप्रमाणेच दरमहा एकत्रित रु ५४०००/- मात्र मानधनावर ११ महिने कालावधीसाठी किंवासदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थानला कंत्राटी कुशल / अकुशल कर्मचारी पुरविणा-या जय भवानी एंटरप्रायजेस,चिंचवड, पुणे कॅम्प श्री साईबाबा संस्थान शिर्डी या कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल कर्मचारी म्हणून नेमणूक देता येईल असे मत आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयात सोनोलॉजीस्ट पदावर एक कुशल कंत्राटी कर्मचारी घेणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१** **सी.टी.स्कॅन मशिनचे (64 Slice) वार्षिक सर्व्हिस कॉन्टॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे. सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation 64 CT Scanner हे मशीन पुरवठा आदेश क्र. 2833/2005, दि. 15/03/2005 अन्वये एकुण रू. 3,98,37,835/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 16/07/2006 रोजी पूर्ण झालेला आहे. सदर सी. टी. स्कॅन मशिनची दि. 31/03/2015 रोजी घसारा वजा किंमत रू. 26,17,309.92/- इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 16/02/2005 च्या सभेतील निर्णय क्र.95 अन्वये पुढील कालावधीतील सि. टी. स्कॅन मशिनसह खरेदी करण्यात आलेल्या Medrad Pressure Injector, Colour Printer, 150 KVA Stabilizer यांचे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कंपनीस देण्यात आलेल्या दि. 15/03/05 च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.15 अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs.30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता करणेत आलेला खर्च, मशीन दूरूस्ती करीता कंपनीने वापरलेल्या स्पेअर पार्टस् ची अंदाजे किंमत आणि सदर मशिनवर आजपावेतो तपासणी करणेत आलेल्या पेशंटची संख्या इ. वर्षनिहाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Period | CAMC Amount Incl. of all Taxes in Rs. | Approx. Cost of Spare Parts in Rs. (replaced by Company in CAMC) | Total No. of Patients Done |
|---|---|---|---|---|
| 1 | 17/07/06 to 16/07/07 | 33,67,200.00 | 15,39,540.00 | 4919 |
| 2 | 17/07/07 to 16/07/08 | 35,39,340.00 | 89,596.00 | 7163 |
| 3 | 17/07/08 to 16/07/09 | 37,16,307.00 | 57,00,000.00 | 7684 |
| 4 | 17/07/09 to 16/07/10 | 38,30,581.00 | 74,00,000.00 | 9303 |
| 5 | 17/07/10 to 16/07/11 | 40,22,110.00 | 91,00,000.00 | 10662 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | 17/07/11 to 16/07/12 | 42,23,216.00 | 65,00,000.00 | 11044 |
| 7 | 17/07/12 to 16/07/13 | 45,17,195.00 | 60,89,673.00 | 9,306 |
| 8 | 17/07/13 to 16/07/14 | 47,00,452.00 | 66,41,000.00 | 9,441 |
| 9 | 17/07/14 to 16/07/15 | 48,97,623.00 | 87,69,473.44 | 7827 |
| | **Total** | **3,68,14,024.00** | **5,18,29,282.44** | **77349** |

मे.सिमेन्स ली. मुंबई यांनी पत्र क्र. West-HIM/CT/Apr15/33920, Dt.24/04/2015 (रुग्णालये प्राप्त दि.27/05/15) अन्वये दि. 17/07/2015 ते दि. 16/07/2016 या कालावधीसाठी CT Scan मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता करारनामा पाठविला आहे. कंपनीने दि.17/07/2015 ते दि. 16/07/2016 या कालावधीसाठी पुर्णांकित एकुण रु.51,42,504/- (पुर्णांकित एकुण अक्षरी रु. एक्कावन्न लाख बेचाळीस हजार पाचशे चार मात्र) इतक्या रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सदर कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण 4 वेळा नियमित सर्व मशिन्सची सर्व्हीसींग करून मशिन ब्रेकडाऊनचे वेळी दुरुस्ती करीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स-रे टयुबसह) बदलणार आहेत आणि त्याकरीता आवश्यक तितक्या वेळा भेटी देणार आहेत. सॉफ्टवेअर व सेफ्टी अपडेट आवश्यकतेनुसार करणार आहेत. सदर मशीन खरेदी करतेवेळी कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट नुसार कंपनीने 98% अपटाईम दिला असून मशिन दुरूस्ती करीता जर कंपनीमुळे एकूण 5 दिवसांपेक्षा अधिक काळ लागला तर सलग 5 दिवसांनंतर प्रतिदिवस रू.7500/- इतका दंड संस्थान कंपनीस आकारते.

कंपनीने मागिल वर्षी नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण 48 वेळा भेटी देउन मागील एक वर्षांत अंदाजे रु. 87,69,473.44/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत.

सी.टी. स्कॅन मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे 22 रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर मागीलवर्षी एकुण 7,827/- पेशंटचे सी.टी. स्कॅन करण्यात आले आहे. (संदर्भ: परीशिष्ट "ब") त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

सदर दुरूस्ती करीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार आहे, त्यामुळे मा. त्रिसदस्यीय समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत मशिन व्यवस्थित काम देत आहे. पुढील काळात ते व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील नऊ वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो.

सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टबाबत खालील बाबींचा विचार होणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

1) मा. व्यवस्थापन समिती दि. 07/08/2014 च्या सभेतील निर्णय क्र.676 अन्वये -

पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा.खंडपीठाची मान्यता मिळालेल्या खर्चाव्यतिरीक्त साईभक्तांना,रूग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी-सुविधा आवश्यक असणाऱ्या सर्व सेवांसाठी लागण री सर्व मशिनरी /उपकरणे व तत्सम यांत्रिक सर्व बाबी यांची AMC,CMC इतर दुरूस्ती यासाठी येणारा खर्च तसेच मालमत्ता कर,रेग्युलर टॅक्सेस,कायदेशीर जबाबदारीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रू.1 कोटी पर्यंतचे खर्च मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधून वगळणेत यावेत.

2) CT Scan मशिन 9 वर्षांपेक्षा अधिक काळापासून नियमित वापरात असल्यामुळे त्यांची नेहमी नियमित व तातडीची दुरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. मा. उच्च न्यायालयापुढे पुर्नमान्यतेसाठी सदर प्रस्ताव सादर करून प्रत्यक्षात मान्यता मिळून तदनंतर पुरवठाधारकास कार्यादेश देणेस अंदाजे सहा महिन्यांचा किंवा अनिश्चित कालावधी लागू शकतो. सदर काळात मशिन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मध्ये नसल्यास व वरील मशिन्सची जर दुरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामुळे मशिन नादुरुस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस् (उदा. एक्स-रे टयुब -किंमत-रु.46 लाख, डिटेक्टर मॉडयुल -रु.60 लाख, ई-बॉक्स-रु.17 लाख इ.) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस् चे खर्चास मान्यता घेणेकरीता प्रत्येक वेळी विविध पार्टस्करीता वेगवेगळे स्वतंत्र प्रस्ताव आवश्यकतेनुसार वेळावेळी सादर करणे प्रस्तावित पद्धतीनुसार आवश्यक राहील. तसेच त्यास मान्यता मिळून कंपनीस कार्यादेश किंवा पुरवठा आदेश देउन प्रत्यक्षात मशिनची दुरूस्ती करणेस अधिक कालावधी लागू शकतो. दरम्यानच्या मशिन नादुरूस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.

3) तसेच सदर प्रकारे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसताना मशिन्सची दुरूस्ती करणेस संस्थानला वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रकमेपेक्षा (सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चा) अधिक खर्च येउ शकतो.

वरील सर्व बाबींचे अवलोकन करून CT Scan मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टसाठीचा खर्च देखील नियमित खर्च असल्यामुळे मा.त्रीसदस्यीय व्यवस्थापन समितीने मा. उच्च न्यायालयापुढे पुनर्मान्यतेसाठी सादर न करता मागील तीन वर्षांपासून दरवर्षी सदर नियमित खर्चास मान्यता दिली आहे.

सदर दुरूस्ती करीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. त्रिसदस्यीय समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे असे मत आहे. कंपनी प्रतिनिधीसोबत प्रत्यक्ष चर्चा करून सदर वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टचे दर कमी करून पुढील दोन वर्षासाठी निंश्चीत करता येतील असे नम्र मत आहे.

तरी CT Scan मशीनचे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडे दि.17/07/2015 ते दि.16/07/2016 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करीता कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून पुढील एक

वर्षासाठी दर निश्चीत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रू.51,42,504/-चे खर्चास मान्यता घेणेस तसेच कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी CMC चे एकुण रकमेपैकी 50% रक्कम सहा महिन्यांनंतर व उर्वरीत 50 % रक्कम वार्षिक सर्व्हिर्स कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागातील सी.टी.स्कॅन (64 Slice) मशिनचे दि.17/07/2015 ते दि.16/07/2016 या कालावधीसाठी मे.सिमेन्स लि,. मुंबई यांचेकडे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी येणाऱ्या अंदाजे रु.५१,४२,५०४/- मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२२ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१५-१६) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सर्व वार्ड/ विभागात दैनंदिन वापरासाठी लागणारे वार्षिक (२०१३-२०१४) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी इ. दरवर्षी सर्व विभागाची वार्षीक मागणी घेऊन ती एकत्रित करुन मा.व्यवस्थापन समिती सभेचे मान्यतेने विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेत येत असते. मागील वर्षी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१४.११.२०१३ चे निर्णय क्र.९०१ अन्वये दोन्ही रुग्णालयांची मिळून रु.५६,६८,५२९/- ची छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मान्यता मिळालेली आहे. सदर छपाई व कार्यालयीन स्टेशनरीकामी दि.१०.०९.२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते. सध्या सदर छपाई व कार्यालयीन स्टेशनरी संपत आलेली असून ती जास्तीत जास्त तीन ते चार महिने पुरु शकेल. त्यामुळे पुढील वर्षाचे वार्षीक छपाई करीता इकडील पत्र क्र.३७० दि.२९.०१.२०१५ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकडून वार्षीक छपाई व कार्यालयीन स्टेशनरीची मागणी प्राप्त झालेली आहे. सदरची प्राप्त मागणी एकत्रित करुन त्याची होणारी एकुण मागणी व सध्या स्टोअरमध्ये असलेली शिल्लक व वापर / खप इ. बघून निव्वळ मागणी तयार करण्यात आली असून त्याचा तक्ता सोबत परिशिष्ट अ व ब म्हणून सादर केला आहे.

गतवर्षाच्या तुलनेत या वर्षाच्या मागणीत व दरात वाढ झालेली आहे. त्याबाबत थोडक्यात कारणमीमांसा खालीलप्रमाणे-

१) अंर्तरुग्ण व बाह्यरुग्ण व शस्त्रक्रिया यांचे तुलनेत मागील वर्षापेक्षा १० ते १२ टक्के रुग्णांत वाढ झालेली आहे.
२) गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या दरात वाढत्या महागाईमुळे (पेट्रोल, डिझेल व Raw मटेरियलच्या किंमती वाढलेल्या आहे.)
३) सदरची मागणीही अंदाजे १ वर्षाकरीता असून त्यात कमी किंवा जास्त खप होऊ शकतो.
४) दोन्ही रुग्णालयात नेहमीच लागणारी छपाई त्याशिवाय काम करणे अशक्य होते. त्यामुळे या वर्षी सदर ॲटमची मागणी १५ ते २० टक्के वाढीव धरली आहे.
५) राजीव गांधी जीवनदायी योजना नव्याने चालू झाल्याने त्यांची मागणी वाढलेली आहे.

वरील कारणास्तव मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी छपाईच्या तुलनेत छपाईची किंमत वाढलेली आहे. त्याचा रक्कमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|
| अ) | **छपाई** | |
| | श्री साईबाबा हॉस्पिटल | २८,२२,०४५.०० |
| | श्री साईनाथ रुग्णालय | २९,८९,७२५.०० |
| ब) | **कार्यालयीन स्टेशनरी** | |
| | श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय (सारखेच आयटम असल्याने एकत्रित मागणी) | ७,२०,९९५.०० |
| | **एकुण रक्कम रु.** | **६५,३२,७६५.००** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे छपाई करुन घेण्यास व कार्या. स्टेशनरी खरेदी करणेकामी अंदाजे रु.६५,३२,७६५/- (अक्षरी रु.पासष्ट लाख बत्तीस हजार सातशे पासष्ट ) मात्र पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणा-या अंदाजे रु.६५,३२,७६५/- (अक्षरी रु.पासष्ट लाख बत्तीस हजार सातशे पासष्ट ) मात्रचे खर्चास, विहीत पध्दतीने ई-निविदा मागवुन छपाई करुन घेण्यास व कार्या. स्टेशनरी खरेदीकामी करणेस व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामीचा प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.२३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २०१५-१६ करीता श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वार्षिक छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रु.६५,३२,७६५/- मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ **शासकीय कामकाजाकरीता संस्थान वाहन उपलब्ध करुन देणेबाबत.**

प्रस्ताव- मा. जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांनी जा.क्र.साशा/कार्या/कॉन्ट-14/200/2015 दि.30/06/2015 रोजीचे पत्राने, शासकीय कामकाजाकरीता मा. अप्पर जिल्हाधिकारी, अहमदनगर व उपविभागीय अधिकारी, कर्जत भाग कर्जत तसेच तहसीलदार, कर्जत यांना तात्पुरते संस्थान वाहन उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली असुन त्यात-

सध्याच्या परीस्थितीमध्ये टंचाई, कायदा व सुव्यवस्था पाहणे, नैसर्गिक आपत्ती, समाजकल्याण विभागाच्या विविध सामाजीक योजना राबविणे, तसेच टंचाई परीस्थीती निवारण करणेसाठी जलयुक्त शिवार अभियान राबविणे या सारख्या जनतेच्या सेवा विषयक बाबी महसूल विभागाकडून राबविण्यात येतात. तसेच ठिकठिकाणी पूर, नैसर्गीक आपत्ती अशा परीस्थीत अधिका-यांना तात्काळ घटनास्थळी भेटी द्याव्या लागतात. ग्रामपंचायत निवडणुका जाहीर झाल्या असल्याकारणाने सदर निवडणुकांचे कामकाज करणे करीता वाहनांची अत्यंत गरज आहे. तसेच नाशिक येथे कुंभमेळा असल्याकारणाने तेथे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाहन सुस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. तरी वर नमुद केलेल्या 03 कार्यालयांना तात्पुरते स्वरुपात 03 ते 04 महिण्याचे कालावधीकरीता आपले स्तरावरुन लवकरात लवकर वाहन उपलब्ध करुन द्यावे, असे नमुद केले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वाहन विभागाकडे उपलब्ध असलेली वाहने संस्थानचे कार्यालयीन कामकाजाकरीता वापरात आहेत. सध्या दि.01 जुलै-2015 ते दि.30 सप्टेंबर, 2015 अखेर नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा असल्याकारणाने शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असलेने सदर साईभक्तांना सुविधा देणेबाबतच्या कामाचे नियोजन चालु आहे. त्यामुळे सदर वाहनांची संस्थानला आवश्यकता आहे.

सिंहस्थ कुंभमेळा कालावधी संपुष्टात आलेनंतर मा.जिल्हाधिकारी सो. यांचे पत्रातील मागणीनुसार, उपरोक्त प्रमाणे 03 वाहने शासकीय कामकाजाकरीता 03 ते 04 महिणे कालावधीसाठी उपलब्ध करुन देणेत येतील.

तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वाहने शासकीय कामकाजाकरीता देणेकामी त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेवुन सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य शासन विधी व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी पाठविता येईल. व सदर प्रस्तावास शासन मान्यता मिळालेनंतर मा.जिल्हाधिकारी सो., अहमदनगर यांचे मागणीप्रमाणे वाहने उपलब्ध करुन देणे बाबतच्या प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

निर्णय क्र.२३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.जिल्हाधिकारी सो., अहमदनगर यांनी दि.०३.०६.२०१५ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेप्रमाणे त्यांचे कार्यालयास शासकीय कामकाजाकरीता ०३-०४ महिने कालावधीसाठी ०३ संस्थान वाहने उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू वाहने उपलब्ध करुन देणेपूर्वी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा व शासन मान्यता आल्यानंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ **श्री साईबाबांचे मंदिरातील आरत्यांच्या वेळा बदलणेबाबत.**

प्रस्ताव- दिवसेंदिवस शिर्डीमध्ये श्रींचे दर्शनाकरीता येणारे साईभक्तांचे संख्येमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. त्यामुळे शिर्डीमध्ये येणा-या सर्व साईभक्तांना सुखकर दर्शन घेता यावे या करीता आरतीचे वेळामध्ये बदल करुन दर्शनाकरीता जादा वेळ उपलब्ध करुन देण्याची गरज निर्माण झाली आहे. यापुर्वीही मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०२.२००८ चे सभेतील विषय क्र.२८, निर्णय क्र.१९६ अन्वये श्रींची काकड आरती पहाटे ०५.१५ वा. ऐवजी पहाटे ०४.३० वा. तसेच शेजारती रात्रौ१०.०० वा. ऐवजी रात्रौ १०.३० वाजता करणेचे ठरले आहे. त्यानुसार दि.६/०४/२००८ रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रींचे काकड आरती व शेजारतीमध्ये बदल करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे बदल करुन मंदिराची दर्शन घेण्याची वेळी १तास १५ मिनिटांनी वाढविण्यात आलेली आहे.

श्रीक्षेत्र पंढरपुर येथील श्रीविठ्ठल-रुख्मिणी मंदिरामध्ये आषाढी एकादशीनिमित्त होणा-या विविध पूजा व धार्मिक विधीसाठी यापुर्वी साधारणः साडेचार ते पाच तास लागत होते. भाविकांची गर्दी व दर्शनाची आस पाहता मंदिर समितीने यंदापासून मोठा बदल स्विकारला आहे. आषाढी एकादशीला रात्री बारा ते पहाटे दोनपर्यंत अवघ्या दोन तासांमध्ये सर्व विधी व पूजा पुर्ण केल्या जाणार आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदाच्या आषाढी एकादशीला भाविकांना दर्शनासाठी अडीच ते तीन तास वेळ जादा मिळणार आहे. भाविकांकरीता २४ तासांपैकी २२ तास श्रीविठ्ठलाचे मंदिर उघडे राहणार आहे, असे त्यांनी वर्तमानपत्रामध्ये जाहिर केलेले आहे.

त्याअनुषंगाने शिर्डी येथे श्रीगुरुपौर्णिमा व सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कालावधीत होणारी वाढीव गर्दी लक्षात घेता, श्रीसाईबाबांचे दैनंदिन आरत्यांमध्ये खालीलप्रमाणे बदल करुन दर्शनासाठीची वेळ वाढविण्यात यावी, असे नम्र मत आहे.

| अ.नं. | सध्याचे आरतीचे वेळ | | संभाव्य आरतीतील बदलाची वेळ | |
|---|---|---|---|---|
| ०१ | काकड आरती | पहाटे ०४.३० वा. | काकड आरती | पहाटे ०४.०० वा. |
| ०२ | मध्यान्ह आरती | दुपारी १२.०० वा. | मध्यान्ह आरती | दुपारी १२.०० वा. |
| ०३ | धुपारती | सुर्यास्ताच्या वेळी | धुपारती | सुर्यास्ताच्या वेळी |
| ०४ | शेजारती | रात्रौ १०.३० वा. | शेजारती | रात्रौ ११.३० वा. |

उपरोक्तप्रमाणे आरतीचे वेळेत बदल केल्यास मंदिराची दर्शनासाठी असलेली वेळ एक तास तीस मिनिटांनी वाढेल. तसेच अशाप्रकारे वेळेमध्ये बदल केल्यास समाधी मंदिर काकड आरतीची पुर्वतयारी करणेसाठी पहाटे ०२.३० वाजता उघडावे लागेल व शेजारती झाल्यानंतर रात्री १२.३० वाजता बंद करावे लागेल असे एकुण दोन तास समाधी मंदिर बंद राहील.

सध्या प्रायोगिक तत्वावर श्रीगुरुपौर्णिमा उत्सव -२०१५ चे कालावधीत तसेच सिंहस्थ कुंभमेळयाचे दि.०१ ऑगस्ट, २०१५ ते दि.३० सप्टेंबर, २०१५ अखेर या कालावधीत उपरोक्तप्रमाणे आरतीचे वेळेतील बदल करणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.२३५ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळयाचे कालावधीत भक्तांची प्रचंड गर्दी होण्याची शक्यता आहे. या कालावधीमध्ये श्रींचे दर्शनाचा सकाळी एक तास व रात्रौ एक तास वेळ वाढविल्यास जास्तीत- जास्त साईभक्तांचे दर्शन होईल व भक्तांचा वेळही वाचेल. या गोष्टी विचारात घेता, दि.०१ ऑगस्ट, २०१५ ते दि.३० सप्टेंबर, २०१५ अखेर या कालावधीत प्रायोगिक तत्वावर श्रींच्या आरत्यांच्या वेळेत खालीलप्रमाणे बदल करणेत यावा.**

| अ.नं. | सध्याचे आरतीचे वेळ | | सिंहस्थ कुंभमेळयाचे कालावधीतील आरतीची वेळ | |
|---|---|---|---|---|
| ०१ | काकड आरती | पहाटे ०४.३० वा. | **काकड आरती** | **पहाटे ०३.३० वा.** |
| ०२ | मध्यान्ह आरती | दुपारी १२.०० वा. | मध्यान्ह आरती | दुपारी १२.०० वा. |
| ०३ | धुपारती | सुर्यास्ताच्या वेळी | धुपारती | सुर्यास्ताच्या वेळी |
| ०४ | शेजारती | रात्रौ १०.३० वा. | **शेजारती** | **रात्रौ ११.३० वा.** |

**तसेच या कालावधीमध्ये ऑनलाईन आरत्या बुक केलेल्या असतील त्या भक्ताना वेळेतील बदलाबाबत कळविणेत यावे व संस्थानचे अधिकृत संकेस्थळावरही प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग/ जनसंपर्क अधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील तसेच श्री साईबाबा संस्थान परिसरातील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेसाठी प्लास्टीक पुन:प्रक्रीया प्लॅंटची उभारणी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईंचे दर्शनाकरीता अंदाजे दररोज अंदाजे 35 ते 40 हजार साईभक्त शिर्डी शहरात दाखल होत असतात. तसेच सध्या शिर्डी नगरपंचायत हद्दीतील लोकसंख्या अंदाजे 25 ते 30 हजार इतकी आहे. यात दिवसेंदिवस वाढ होत असून, याव्दारे शिर्डी शहरात दररोज अंदाजे आठ ते नऊ टन कचरा जमा होत आहे.

शिर्डी नगरपंचायत व संस्थान परिसरातील सर्व कचरा शिर्डी संस्थानचे सहकार्याने पिंपळवाडी येथे उभारणी केलेल्या व राहाता नगरपालिका यांचे मालकीचे असलेले कंपोस्ट डेपो जागेत टाकणेत येत होता. सदरचे कच-यात मोठ्या प्रमाणात प्लास्टीक असल्याकारणांने पिंपळवाडी येथील ग्रामस्थांनी कचरा टाकण्यास मनाई केलेली आहे. त्यामुळे कच-याचे विल्हेवाट लावण्याची मोठी समस्या निर्माण झालेली आहे. सध्या संस्थान परिसरातील कचरा संस्थानचे निमगाव हद्दीतील जागेत टाकणेत येत आहे. तसेच शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सुका कचरा घरोघरी घंटा गाड्याने गोळा करण्यात येत असून, नंगरपंचायतीने नेमणूक केलेल्या ग्रीनी द ग्रेट, पुणे या संस्थेमार्फत केलेल्या जनजागृती, प्रसार, प्रचाराच्या माध्यमातून कच-याचे वर्गीकरण करण्यात येत आहे. तसेच 2 ते 3 टन सुका कच-याची खाजगी एजन्सीमार्फत विल्हेवाट लावण्यात येत असुन ओल्या कच-याबरोबर १ ते १.५ टन प्लास्टीक कचरा शिल्लक राहत आहे.

प्लास्टीक मटेरिअल हे Non-Biodegradable असल्याने त्याचे विघटन लवकर होत नाही. तसेच प्लास्टीक कचरा जाळल्यानंतर कार्बनडायऑक्साईड मोठ्या प्रमाणात वातावरणात मिक्स होत असल्याने, तो जाळताही येत नाही. त्यामुळे प्लास्टीक कच-यावर पुर्न-प्रकिया करुन प्लास्टीक कच-याची विल्हेवाट लावणे हाच शाश्वत उपाय आहे. तसेच प्लास्टीक पुर्न-प्रक्रियेनंतर तयार होणा-या कच्च्या मालापासून आर्थिक उत्पन्नही मिळेल. प्रामुख्याने प्लास्टीक पुर्न-प्रक्रियेत खालील बाबींचा सामावेश होतो :

(1) प्लास्टीक गोळा करणे
(2) प्लास्टीक धुणे व सुकविणे
(3) प्लास्टीकची विगतवारी करणे
(4) प्लास्टीकची कटींग करुन, बारीक तुकडे तयार करणे
(5) प्लास्टीकच्या बारीक तुकड्यावर प्रक्रिया करुन, ग्रॅन्युअलस् तयार करणे.

सध्या जमा होणारे प्लास्टीक कचरा प्रमाणानुसार प्लास्टीक पुर्न-प्रक्रिया प्रकल्पाचा तांत्रिक तपशील खालीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाकरीता लागणारी जागा | : | 40 मीटर x 30 मीटर |
| वीज | : | 133 H.P. |
| मनुष्यबळ | : | 4 व्यक्ती प्रती शिफ्ट |
| भांडवली गुंतवणूक | : | रुपये 55 लाख (बांधकाम कामासह) |

उपरोक्तप्रमाणे प्लास्टीक कचरा पुर्न-प्रक्रिया प्रकल्प उभारणीकामी अंदाजे रुपये 55 लाख मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरचे प्रकल्प उभारणीकामी येणारा खर्च तसेच प्रकल्पासाठी लागणारी जागा, मनुष्यबळ, वीज, पाणी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देता येईल. सर्व प्लास्टीक कचरा शिर्डी नगरपंचायत यांचे मार्फत गोळा करुन प्रकल्पस्थळी आणून पुर्न-प्रक्रियेनंतर तयार होणारा कच्चा प्लास्टीक मटेरिअलची संस्थानमार्फत विक्री करता येईल.

सदर प्रकल्पाची उभारणी संस्थानचे विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळाल्यानंतर सदरचा खर्च Major Financial असल्याने त्यास मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घ्यावी लागेल.

तरी शिर्डी नगरपंचायत व संस्थान परिसरातील प्लास्टीक पुर्न-प्रक्रिया प्रकल्प उभारणीस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 55 लाख मात्रचे खर्चास मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्तावावर सखोल अभ्यास करुन फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा विषय नं.०४ **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी शिर्डी नगरपंचायत हद्दीत ठेवणेसाठी वाढीव पोर्टेबल टॉयलेट भाडेतत्वावर घेणे तसेच वाहनतळावरील पोर्टेबल टॉयलेट व युरीनल्सचे वाढीव कालावधीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

०१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

०२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*".. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी.*

*तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."*

**मा.उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:-** Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना :-** दि.२८ ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साई भक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, **तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था**, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इ. सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये इकडील विभागामार्फत १६० पोर्टेबल टॉयलेट व १६० युरिनल्स भाडेत्तवावर घेणेसाठी विहीत पध्दतीने निविदा प्रक्रीया राबविणेत आलेली आहे. या कामासाठी ठेकेदार वायएलडीए इंडिया प्रा. लि., पुणे यांनी देऊ केलेले निम्नतम दर स्विकारणेत येवून त्यांना कार्यादेश देणेबाबतचे प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेली आहे.

**प्रस्ताव :- अ) साईभक्तांचे सोयीसाठी शिर्डी नगरपंचायत हद्दीत पोर्टेबल टॉयलेट उभारणे :** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१५/०६/२०१५ व दि.२३/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हद्दीत सार्वजनिक शौचालय उभारणी कामी नगरपंचायत हद्दीत सूचविलेल्या एकुण पाच ठिकाणी कायमस्वरुपी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

दि.१२/०७/२०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य, मा.त्रिसदस्य समिती यांनी सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ कालावधीत साईभक्तांचे अतिरीक्त सोयीसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हद्दीत साईभक्तांचे अतिरीक्त सोयीसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे पोर्टेबल टॉयलेट व युरिनल्स भाडेतत्वावर संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश दिले आहेत. तसेच दि.२१/०७/२१५ रोजी मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचे बैठकित अतिरिक्त दर्शन रांगेतील साईभक्तांचे सोयीकरीता नविन पिंपळवाडी रस्ता कॉर्नर, बस स्थानक आवार व महसूल भवन या ठिकाणी महीला व पुरुष यांचेकरीता प्रत्येकी दोन पोर्टेबल टॉयलेट ठेवण्याचे ठरले आहे. त्यानुसार तात्पुरत्या स्वरुपात पोर्टेबल टॉयलेट उभारावयाची ठिकाणे खालीलप्रमाणे आहेत.

१) स.नं.१७०पै. श्री. छ. शि. म. दुकान संकुलासमोर.
२) स.न. १७० पै. नांदुर्खी रस्ता व्यायमशाळेलगत.
३) हिंदु स्मशानभुमी शेजारील जागा.
४) पिंपळवाडी रुई रस्ता चौक जागा.
५) शिर्डी बसस्थानक, आवारात नगर-मनमाड रस्त्यालगत.
६) नवीन पिंपळवाडी रस्ता दक्षिण बाजू कॉर्नर
७) जुना पिंपळवाडी रस्ता महसुल भवन जागेत.

**कालावधी - दि.२८/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ – ३० दिवस**

| Sr. No. | Description of Work | Days | Total Qty. | Rate / Unit (Rs.) | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Portable Toilets with septic / collection tank - **Operative Days.** | 20 | 28 | Rs.1000/- per No. per day. | **5,60,000/-.** |
| 02) | Portable Toilets with septic / collection tank - **Non-Operative Days.** | 10 | 28 | Rs.500/- per No. per day. | **1,40,000/-.** |
| | | **TOTAL AMOUNT RS.:** | | | **7,00,000/-.** |

**ब) वाहनतळावर ठेवणेसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरिनल्स चे वाढीव कालावधीचा खर्च :**

मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व तालुकास्तरीय कुंभमेळा सिमती, यांचे बैठकांमध्ये आलेल्या चर्चेनुसार पर्वणीचे कालावधीत गर्दी वाढणेची शक्यता असल्याने साईभक्तांचे सोयीसाठी उभारण्यात येत असलेल्या पोर्टेबल टॉयलेट व यरिनलचे पर्वणी काळातील वापरात वाढ करण्याचे सुचना देण्यात आलेल्या आहेत. यापुर्वी प्रत्येक पर्वनीचे वेळी अगोदरचा एक दिवस, मुख्य दिवस व नंतरचा एक दिवस असे ०३ दिवस वापराचा कालावधी (Operating Days) धरण्यात आले होते. आता प्रत्येक पर्वनीला ०५ दिवस याप्रमाणे ०४ पर्वनींकरीता एकूण २० दिवस वापर कालावधी ठेवावा लागेल. त्यानुसार वाढीव कालावधीसाठी खालीलप्रमाणे वाढीव खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No. | Description of Work | Additional Days | Qty. | Diff. Rate/ Unit (Rs.) | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| **A** | **Toilets** | | | | |
| 01) | Portable Toilets with septic/ collection tank - **Operative Days. (Rate Diff.)** | 8 | 140 | Rs.500/-per No. per day. | 5,60,000/-. |
| 02) | Portable Toilets without septic/ collection tank - **Operative Days. (Rate Diff.)** | 8 | 20 | Rs.750/- per No. per day. | 60,000/- |
| **B** | **Urinals** | | | | |
| 01) | Portable Urinals with septic/ collection tank - **Operative Days. (Rate Diff.)** | 8 | 140 | Rs.900/- per No. per day. | 5,04,000/- |
| 02) | Portable Urinals without septic/ collection tank - **Operative Days. (Rate Diff.)** | 8 | 20 | Rs.600/- per No. per day. | 48,000/- |
| | | | **TOTAL AMOUNT RS.:** | | **11,72,000/-** |

वरीलप्रमाणे अ व ब मिळूण एकूण रु.१८,७२,०००/- मात्र अपेक्षीत आहे. सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत संस्थानतर्फे करावयाच्या अतिरिक्त सुविधांसाठी एकुण अपेक्षीत खर्च रु.५७,५४,८०,०००/- मात्र पैकी होणा-या संभाव्य बचतीतून हा खर्च करता येईल.

तरी सदरहु खर्चास व ठेकेदार वायएलडीए इंडिया प्रा. लि., पुणे यांचेकडून पोर्टेबल्स् टॉयलेटस् व युरिनल्स् निम्नतम मंजूर निविदा दराने भाडेतत्वावर घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी शिर्डी नगरपंचायत हद्दीत ठेवणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढीव पोर्टेबल टॉयलेट भाडेतत्वावर घेणे व वाहनतळावरील पोर्टेबल टॉयलेट आणि युरीनल्सचे वाढीव कालावधीस व अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच उपरोक्त निर्णय क्र.२२१ अनुसार ज्यांचे प्रस्तावितकामी निम्नतम दर येतील त्यांनाच याकामी मंजुर दराने कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.२३८** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** श्री.आप्पासाहेब शिंदे, उपकार्यकारी अधिकारी यांची दि.१४.०३.२०१५ रोजी उपकार्यकारी अधिकारी पदाची मुदत संपुष्टात आलेली होती. त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील सासंवि २०१४/ ३०/ प्र.क्र.१४/ का.सोळा, दि.१३ जुलै २०१४ (२०१५) रोजीचे पत्रानुसार श्री.आप्पासाहेब शिंदे यांना दि.१४.०३.२०१५ पासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली आहे. या आदेशाने श्री.आप्पासाहेब शिंदे हे दि.१४.०७.२०१५ रोजी उपकार्यकारी अधिकारी पदावर हजर झालेले आहेत.

श्री.आप्पासाहेब शिंदे, उपकार्यकारी अधिकारी यांनी दि.१४.०३.२०१५ ते दि.१३.०७.२०१५ या कालावधीमधील त्यांचे थकित वेतन मिळणेबाबत सभेस विनंती केली. परंतु दि.१४.०३.२०१५ ते दि.१३.०७.२०१५ हा कालावधी रजा/ कर्तव्य किंवा सक्तीचा प्रतिक्षाधीन यापैकी काय म्हणून समजणेत यावा, याबाबत शासन आदेशामध्ये कोणताही उल्लेख नाही, असे कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

यावर सभेने साधक-बाधक चर्चा करुन, श्री.आप्पासाहेब शिंदे, उपकार्यकारी अधिकारी यांचेकडून याबाबत बंधनपत्र लिहूण घेऊन, त्यांचे दि.१४.०३.२०१५ ते दि.१३.०७.२०१५ या कालावधीमधील थकित वेतन त्वरीत अदा करावे, अशा सूचना समितीचे अध्यक्ष तसेच जिल्हाधिकारी तथा समिती सदस्य यांनी दिल्या.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ मुख्यलेखाधिकारी)

---

वरील निर्णय क्र.२१२ ते २३८ सर्वानुमते घेण्यात आला.
यानंतर रात्रौ ११.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी